
# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०२४

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष चोविसावे

अंक दुसरा


## २७ फेब्रुवारी

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते,
'पद्मभूषण' विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ
कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस

# मराठी राजभाषा दिन





# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’ २०२३















**सर्वोत्कृष्ट कथासंग्रहासाठी प्रमोद अणेराव यांना सन्मानित करण्यात आले. सर्वोत्कृष्ट कादंबरीसाठी प्रदीप कोकरे यांना सन्मानित करण्यात आले. अश्विन सांघी लिखित ‘द मॅजिशियन ऑफ माझदा’ या पुस्तकाच्या ‘माझदाचे जादूगार’ या मराठी अनुवादाचे प्रकाशन**











# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक दुसरा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य :**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

— *अनुक्रमणिका* —

**संपादकीय** ४
**पुरस्कार** ८
**वितरकाच्या नजरेतून** १०
**पुस्तकाच्या पानांतून**
झंगाट १४
तिंगाड २०
यशवंतराव चव्हाण :
आठवणी-आख्यायिका ३२
विमुक्तायन ३८
उद्ध्वस्त ४४
ब्लॉटिंग पेपर ५२
**दिनविशेष** ६२

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## मराठी असे आमुचि मायबोली...

भाषा हा आपल्या जीवनातील अविभाज्य असा घटक आहे. भाषा ही सांस्कृतिक देवाणघेवाणीचे एक प्रमुख साधन म्हणून मानले जाते. दैनंदिन व्यवहारात आपण आपल्या बोली भाषेतून संवाद साधत असतो. महाराष्ट्रात प्रादेशिक बोली वेगवेगळ्या प्रदेशात आपल्याला पाहायला मिळतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठी या भाषेचा वापर केलेला आपण पाहतो. मराठी या भाषेला शासन स्तरावर राजभाषेचा सन्मान दिलेला आपण पाहतो. मराठी भाषेतील चार साहित्यिकांना आत्तापर्यंत ज्ञानपीठ सन्मानाने सन्मानित केलेले आहे. त्याचप्रमाणे जवळपास प्रत्येक वर्षी मराठी भाषेतील एका साहित्यकृतीचा 'साहित्य अकादमी' पुरस्कारानेही सन्मान झालेला आहे.

महाराष्ट्र राज्याची मातृभाषा म्हणून मराठी भाषा असलेली आपल्याला दिसून येते. मराठी भाषेत यादव काळापासून ते आतापर्यंत अनेकविध प्रकारचे साहित्य निर्माण झालेले आहे. मराठी भाषा शालेय स्तरापासून ते विद्यापीठ स्तरापर्यंत अभ्यासक्रमात आहे; मात्र या भाषेबद्दल अलीकडच्या काळात मराठी या आपल्याच भाषेबद्दल असलेले औदासीन्य पाहायला मिळते. दक्षिणेकडील राज्याच्या तुलनेत आपले आपल्या भाषेविषयी असणारे प्रेम व भाषिक अस्मिता किती, हा थोडा संशोधनाचा तसेच वादाचाही विषय.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही मागणी तर कित्येक वर्षे शासनदरबारी लाल फितीच्या कारभारात अडकलेली अशी

मागणी. त्यासंबंधी अनेक शिष्टमंडळे, अभ्यासमंडळे यांची निवेदने जाऊनही त्याबाबत सकारात्मक असा काहीही तोडगा अद्याप निघालेला नाही. 'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे 'अभिजात भाषा' या चर्चेचे गुऱ्हाळ दर सहा-आठ महिन्यांनी आपण पाहत असतो. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळायचा तेव्हा मिळेल; मात्र महाराष्ट्राची राजभाषा म्हणून मराठीचे स्थान महत्त्वाचे असेच आहे.

मराठी भाषेत असलेल्या अनेक साहित्यकृती, कोशवाङ्मय, संपादन केलेले साहित्य ते कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी ललित वाङ्मयाचे साहित्य हे दालन समृद्ध असे आहे. ज्ञानदेवांनी लिहिलेली ज्ञानदेवी तथा ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, नामदेव गाथा, एकनाथी भागवत ही अर्वाचीन मराठीतील अहेव लेणी. मराठी विश्वकोश, वाक्संप्रदायकोश, विविध प्रकारचे शब्दकोश ही मराठी भाषा जाणून घेणाऱ्यांसाठी व शिकणाऱ्यांसाठीची महत्त्वाची साधने असलेली आपण पाहतो. शासन स्तरावर विश्वकोश मंडळ, साहित्य संस्कृती मंडळ यांच्या माध्यमातून मराठी भाषेसाठी विविध प्रकल्प व उपक्रम हाती घेऊन मराठी भाषेबाबत प्रयत्न केलेले आपण पाहतो.

दरवर्षी भरणारी साहित्य संमेलने, साहित्यविषयक कार्यशाळा या माध्यमातूनही मराठी भाषेचा जागर झालेला आपल्याला पाहायला मिळतो. भाषा सप्ताह, भाषा संवर्धन पंधरवडा अशा प्रकारच्या कार्यक्रमांतून मराठी भाषा आणि तिच्या प्रसाराबद्दल केलेले काम आपल्याला दिसून येते. दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करून आपल्या भाषेबद्दल असणारे प्रेम व आस्था आपण व्यक्त करत असतो. या महिन्यात मराठी राजभाषा दिवस आहे. त्या निमित्ताने आपण आपले भाषिक प्रेम व अस्मिता दाखवूया. किमान दैनंदिन व्यवहारात मराठीचा केला जाणारा वापर अजून कसा वाढवता येईल व मराठी भाषा ही अजून उन्नत कशी होईल यासाठी प्रयत्न करूया.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# पुरस्कार

## प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार २०२३

१० जानेवारी, २०२३ रोजी किरण बेदी यांच्या उपस्थितीत 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार २०२३' या पुरस्काराची घोषणा करण्यात आली होती. त्याप्रमाणे २०२३ या वर्षात प्रकाशित झालेल्या प्रथम प्रकाशित सर्वोत्कृष्ट कादंबरीमध्ये प्रदीप कोकरे लिखित 'खोल खोल दुष्काळ डोळे' आणि प्रथम प्रकाशित सर्वोत्कृष्ट कथासंग्रहामध्ये प्रमोदकुमार अणेराव लिखित 'झुरळ आणि इतर काहीबाही' कथासंग्रहाची निवड करण्यात आली.

१२ जानेवारी रोजी सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथील गणेश हॉल येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रसिद्ध लेखक अश्विन सांघी, ज्येष्ठ अनुवादिका उमा कुलकर्णी, समीक्षक प्रा. रणधीर शिंदे, मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता, साहिल मेहता, रूपा मेहता इ. मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी प्रकाशक सुनील मेहता यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला, त्यांनी आखून दिलेल्या मार्गावर प्रकाशन संस्थेचे काम सुरू असून, नवीन उपक्रमांवर भर देण्याचे त्यांचे धोरण कायम अवलंबले जाते. त्यांच्या नव्या लेखकांना व नव्या तंत्रज्ञानाला प्राधान्य

देण्याच्या या धोरणामुळेच हा पुरस्कार त्यांच्या स्मृतीसाठी देण्यात आला, असे अखिल मेहता यांनी मनोगतात सांगितले, तसेच यावेळी उपस्थित असलेले मेहता पब्लिशिंग हाऊसचे मुखपृष्ठकार व प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी आणि ज्येष्ठ अनुवादिका लीना सोहोनी यांचा सत्कार करण्यात आला .

अश्विन सांघी लिखित 'माझदाचे जादूगार' या मराठी अनुवादाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी पुस्तकाबद्दल बोलताना लेखक म्हणाले, 'माझ्या लिखाणाची मुख्य व्याख्या म्हणजे मिथ आणि हिस्ट्री म्हणजेच मिस्ट्री.' मुळात घरातील व्यावसायिक पार्श्वभूमी असूनही त्यांची लेखनाकडील वाटचाल सांगताना लेखक म्हणाले, 'घरातून आलेल्या डेबिट आणि क्रेडिट या दोन शब्दांकडे लक्ष न देता, तुकारामांनी सांगितलेल्या 'पुस्तकातून ज्ञानाचा प्रकाश उजळतो' याकडे जास्त लक्ष दिले.'

सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्काराचे मानकरी असलेले लेखक प्रदीप कोकरे त्यांच्या कादंबरी 'खोल खोल दुष्काळ डोळे' या कादंबरीबद्दल सांगताना म्हणाले, 'घरात कोणतीही शिक्षणाची पार्श्वभूमी नसताना घेतलेलं शिक्षण आणि गावाबाहेर पडून घेतलेला शहरी जीवनाचा अनुभव. तसेच अवांतर वाचन करताना पुस्तकातून भेटलेले नायक बरेचसे आपल्यासारखेच वाटत असल्याने आपणही पुस्तक लिहील पाहिजे या प्रेरणेतून लिखाणाचे बीज मनात रुजले.' ते असंही म्हणाले, 'परिस्थिती बदलता येत नसेल तर त्याला सामोरे जाण्याची सोपी पद्धत आत्मसात करावी.' प्रा. रणधीर शिंदे यांनी पुरस्कारप्राप्त साहित्यकृतींविषयी विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अक्षय वाटवे यांनी केले.

◆



# वितरकाच्या नजरेतून

'पुस्तकवाले' सुरू होण्यासाठी निमित्त झालं मित्राच्या मुलाला पुस्तक भेट देण्याचं. आणि एकाच दिवशी मन अस्वस्थ करणाऱ्या एकाच विषयाच्या दोन बाजू समोर आल्या. मी आणि ऋतिका पुस्तक विकत घ्यायला राजहंस पुस्तक पेठेत गेलो होतो. तिथे जोशीकाकांशी बोलताना लक्षात आलं की, लॉकडाऊनपासून पुस्तक विक्रीत बरीच घट झालीये; पण ज्यांना पुस्तक भेट दिलं, त्यांचं म्हणणं होतं की, पुस्तकांची दुकानं गावाबाहेर नाहीतच आणि एखादं सापडलंच तरी तिथे मराठी पुस्तकं नसतात. दोघांची अडचण समजण्यासारखी होती. आता या दोघांमध्ये एक पूल बांधण्याच्या भूमिकेतून आपण काही करावं, यावर आमच्या दोघांचं विचारमंथन सुरू झालं.

ज्या मित्राच्या घरी आम्ही गेलो होतो, तो मित्र सोसायटीचा चेअरमन होता. तुम्ही याबाबतीत काही करणार असाल तर या आपल्या बाणेरमधल्या सोसायटीत स्टॉल मांडायची परमिशन मी देतो. ही खात्री त्यांनी दिली. याबरोबरच चालून आलेली संधी म्हणजे मला ऑफिसमधून काही कारणाने तीस हजाराची गिफ्ट व्हाउचर्स मिळाली. तशी आम्ही दोघांनी थेट दोन सुटकेस भरून तीस हजार रुपयांची पुस्तकं विकत घेतली! मित्राने सांगितल्याप्रमाणे पहिला स्टॉल बाणेरला त्यांच्या सोसायटीत लावला. पुस्तकं निवडणे, स्टॉल मांडणे, ग्राहकांशी संवाद, अशा अनेक गोष्टींमध्ये या क्षेत्रातल्या वरिष्ठांकडून मार्गदर्शन मिळालं आणि त्यांच्याच हस्ते उद्घाटनही झालं. पहिलाच प्रयोग होता, त्यामुळे लोक पुस्तकं बघायला येतील,

घेतील, एवढीच अपेक्षा होती; पण वास्तविक प्रतिसाद अगदी कल्पनेबाहेर मिळाला. हे पाहता ऋतिकाच्या आई, ज्या सोसायटीत राहतात, तिथल्या सोसायटीच्या त्या चेअरमन आहेत; त्याही म्हणाल्या की, आपण इथे स्टॉल लावून पाहू. त्यानंतर अजून एका मित्राने आम्हाला त्याच्या सोसायटीत बोलावलं, मग तळेगावला अजून एका मित्राच्या कार्यालयात.. असं करताकरता अनेक मदतीचे हात पुढे येत गेले आणि ही आयडिया हिट होऊ लागली.

आता मात्र या सगळ्याला एक व्यवस्थित व्यावसायिक स्वरूप देण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरू केले. बॅनर्स छापून घेतले, पत्रकं वाटली. सोसायटीत भाजीची गाडी जाते, किरणामालाची जाते, चितळेंची जाते, तर यापुढे प्रत्येक वीकेंडला आपण 'पुस्तकवालेची' गाडीसुद्धा घेऊन जायची, हे ठरवून टाकलं

मध्यंतरात अजून एक छान गोष्ट झाली. इसुझू कंपनीने एका ऑनलाईन कॉन्टेस्टमध्ये कोरोना काळात सामाजिक कल्याणाच्या हेतूने केलेल्या व्यवसायांची दखल घेऊन सातशे सहभागींपैकी 'पुस्तकवाले'ला बक्षीस म्हणून एक कस्टमाईज्ड ट्रक भेट दिला, ज्याच्या आत आणि बाहेर पुस्तकं मांडता येतील. या 'पुस्तकवाले'च्या फिरत्या ट्रकवर पुस्तकं बघायला अनेक ज्येष्ठ नि नामवंत मंडळी आली. लोकांचं प्रेम, कौतुक आणि शुभेच्छा भरभरून मिळाल्या. त्याचबरोबर या कार्यात हातभार लावू पाहणारी अनेक तरुण मुलंसुद्धा आमच्याबरोबर काम करण्याची इच्छा दाखवू लागली. या मुलांची आवड समजून घेत आम्ही या युवकांना कधीही सेल्स टारगेट दिलं नाही; पण दिवसभराच्या कष्टाचा मोबदला द्यायला सुरुवात केली. त्यामुळे याकडे मुलं इंटर्नशिप म्हणूनसुद्धा पाहू लागली.

आता एका वेळी तीन - चार ठिकाणी स्टॉल लावलेले असतात. त्यामुळे स्टॉलची मांडणी, नव्या इंटर्न्सना सोपी जावी, आणि त्यात काही बदल, गोंधळ होऊ नये यासाठी पुस्तकं मांडायच्या ठिकाणी प्रिंटेड शीट्स अंथरलेल्या असतात. त्याप्रमाणे तिथे पुस्तकं मांडायची आणि अगदी भरतानाही क्रेट्सवर लिहिलेल्या अंकवारीप्रमाणेच भरायची, जेणेकरून पुढचा गोंधळ टाळता येईल.

या इंटर्न्सच्या मदतीने विविध सोसायट्यांमध्ये जाऊन पत्रकं देऊन येणे, तिथल्या मॅनेजिंग कमिटीमध्ये असणाऱ्यांचे फोन नंबर्स मिळवून त्यांना फोन करणे, सोसायटी मोठी असेल तर शक्यतो स्टॉल लावण्याचं वार्षिक कॉन्ट्रॅक्टच

करणे, ही कामं चालू झाली. स्टॉल लावण्यासाठी संमती मिळाली की, ग्राहकांना प्रशस्त वाटेल अशी जागा आहे ना याची स्वत: जाऊन पाहणी करायची. पावसाच्या दिवसांत बंदिस्त सभागृहात पुस्तकं मांडायची. क्वचित ओलीमुळे किंवा जास्त हाताळली गेल्याने खराब झालेली पुस्तकं सॅम्पल कॉपी म्हणून चाळण्यासाठी ठेवली जातात. महिन्यातून एकदा सगळा स्टॉक काढून, बिलिंगप्रमाणे तपासून पुन्हा नीट ठेवावा लागतो. स्टॉक ठेवण्याचा अवधी प्रत्येक प्रकाशकाप्रमाणे आणि पुस्तकाप्रमाणे ठरतो. हे फिरतं पुस्तकालय असल्याने कोणत्याही पुस्तकाच्या एकावेळी तीन ते चार प्रतीच घेतल्या जातात. आम्ही दोघं स्वत: भरपूर वाचत असल्याकारणाने 'मला जे आवडलं ते इतरांना नक्कीच आवडेल' या निकषावर पुस्तकं निवडली जातात. नवलेखकांसाठी vocal for local असाही एक प्रयोग आम्ही केला, ज्याद्वारे नवसाहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला गेला.

आता कोरोना संपला आणि लोक घराबाहेर पडू लागले, तशी पूर्वी वीकेंडला पुस्तकांसाठी होणारी गर्दी थोडी कमी होऊ लागली. काळाची गरज ओळखून 'पुस्तकवाले'चा ट्रक आता आपल्याला विविध शाळांमध्येसुद्धा दिसतो. त्याचबरोबर कंपन्यांमध्ये विरंगुळा म्हणून 'एक लायब्ररीसुद्धा असू शकते' ही कल्पना 'पुस्तकवाले' कॉर्पोरेट कल्चरमध्ये रुजवू लागले आहेत. त्यामुळे अलीकडे अनेक कंपन्यांच्या HR Activitiesचा भाग म्हणूनसुद्धा 'पुस्तकवाले'ला मागणी असते.

तर ज्यांना पुस्तकं घेण्यासाठी घरातून बाहेर पडण्याची सवड नाही, सोय नाही, अशांसाठी, तर हा 'पुस्तकवाले' हा अभिनव उपक्रम आहेच; पण लोकांच्या गरजा नेमकेपणाने ओळखल्या तर एका अभिनव उद्योगाची निर्मिती होऊ शकते याचं एक आदर्श उदाहरणदेखील आहे.


**– आशय वाळंबे**
'पुस्तकवाले'

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# अमीर खुस्रो

**मिलिंद तेजराव जाधव**





काव्य आणि शासकांच्या इतिहासाचा अनोखा संगम साधत शेकडो वर्षं भारतीय साहित्यावर प्रभाव टाकणाऱ्या महाकवीची दास्तान...

**किंमत : ३६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


# फ्रीडम ऑन फायर !

**लक्ष्मीकांत देशमुख**




रशिया-युक्रेन युद्धभूमीच्या विशाल आशयपटलावर मानवी संवेदनांना आव्हान देणाऱ्या कथा...

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# झंगाट

**महादेव मोरे**

*श्रीपती आणि रुक्कीचं जुळलं सूत छान...*
*या प्रकरणानं उठलं रान...*
*'झंगाटा'नं या मग गाजवलं गाव*

किनिट पडून पार अंधार झाला आणि हेडलाइट्सच्या प्रकाशाने त्या अंधाराला चिरीत एक टॅक्सी गावात शिरली अन् चावडीपुढे येऊन उभी राहिली.

चावडीच्या पुढच्या व्हरांड्यातील खांबाला टेकून, नुकताच चिलमीचा बार भरून, भकाभका धूर काढीत बसलेला बज्याबा तराळ गाडीच्या आवाजाने सावरून बसला. शेवटचा झुरका मारून बाजूच्या फरशीवर

त्याने चिलीम डब मारून विझविली. तंबाखूबरोबर तळचा गरम झालेला खडाही खाली पडला; तो त्याने चिमटीने उचलून रिकाम्या चिलमीत टाकला व तळाला गुंडाळलेली छापी काढून ती तशीच चिलमीच्या रिकाम्या तोंडात सारली आणि ती आच्चुती खिशात सारून तो उठला अन् त्याने गाडीच्या दिशेने पाय उचलला...

तोवर गाडीतून पंचेचाळीसच्या उमतीचा, भरभक्कम बांध्याचा एक माणूस खाली उतरला... तालुक्याच्या पोलीस कचेरीतला ह्यो हवालदार ड्रेसवर न्हाई, साध्या कपड्यातच हाय, म्हणून काय झालं? ह्या काळ्यारोम बनहट्टी रंगाच्या मान्साची वळख तशी सहजासहजी ईसरता ईल काय? छे:! छे:! तराळानं झट्कन ओळखलं त्याला आणि ह्या कानापास्नं त्या कानापर्यंत दाढवान ईचकून हसत म्हणाला,

''रामराम जी, हावालदारसायेब!''

''रामराम!'' आणि हवालदारानं कानडी हेल काढीत मराठीची मोडतोड सुरू केली, ''त्ये पाटील कुठं होगीद्रीऽ?''

''मळ्यानं, आता कुठं आस्तील घरात. हिकडंबी येतील म्हणा एवढ्यात!'' अन् तराळ म्हणाला,

''वरतं तरी या – बसा, या घटकाभर.''

''टाइम इल्ला तराळमगनं. दौड होग मनीकडे, नि तरकोन बाऽलगुट.'' हुकूम केल्याच्या आवाजात हवालदारानं पाटलाला बोलावून आणण्यास फर्मावलं.

तसा तराळ सुटलाच... ''का? कशाला? काय काम हाय?'' आदी नेहमीच्या स्वभावानुसार चांभारचौकशी करण्याची भांबही त्याला राहिली नाही...

पाटलाचं घर येताच, जोता चढायच्या आधी उंबऱ्यातनंच आपल्या खणखणीत आवाजात त्यानं हाळी ठोकली,

''पाटील, अवं पाटीलऽ.''

''का रं झवन्‌बाळाबाईच्याऽ.'' हाक ऐकताच जोत्यावर टेकल्याला पाटील कावदारला, ''नुक्ताच मळ्यास्नं ईवून बूड टेकीवलंय तंवरका आलास बोंबलभिक्यागत बोंबलत.''

''चला लौकर. तालुक्यास्नं हावालदार आलाय न्हवं – पेशल टोरिंग मोटार घिऊन.'' पाटलाचं बोलणं कानाआड करीत तराळ म्हणाला. जरा तरास पडला की पाटील आसं भकत ऱ्हातंय् – खुळ्याकावऱ्या कुत्र्यावानी! नि हे सारं तर नेहमीचंच, म्हणून आंगवळणी पडल्यालं. एखांद्यावक्ती ते थंड

आवाजात बोलायला लागल्यावर मतोर जरा आजब वाटतंय. हे शीक बिक हाय का काय, आसं वाटायला लागतंय् मग. न्हाईतर सदाचंच ह्येचं बोलणं म्हंजे नरड्यात कोणतरी शेंदूर घाटल्यावानी.

“ह्येंचा आय्चा तांगडाऽ, ह्या पोलिसांचं एक रात न्हाय, दिवस न्हाय, कवा पायजे तवा उठतंय.” असं तक्रारखोर आवाजात पुटपुटत पाटलानं डुईवर पटका गुंडाळला, पालथी मूठ फिरवीत मिश्यांचं कंगाल वर सारून चेहऱ्यावर उग्र, राकट असा रुबाबदार एबाव आणला आणि तराळाबरोबर निघाला... पाटलाच्या लांब लांब ढेंगा अन् त्याला गाठायला मागनं लगालगा तराळ चालत्याला, असं नेहमीचं दृश्य दिसू लागलं...

ही जत्रा येईस्तोवर हवालदार चावडीच्या आतल्या अंगाला जाऊन सिगारेटचा धूर काढीत बसला होता.

“रामराम! होऽ, हावालदारसायेब!!” आत येता-येता पाटील म्हणाला आणि सलगीनं हसला.

“रामराम!” हवालदार म्हणाला नि त्यानं चुटकी वाजवून सिगारेटच्या टोकांवरील राख उडविली.

“ह्या अशा बिगरटाइमाचं एवढी आरज्येंट काय कामगिरी काढलासा...?” हवालदाराजवळच जाजमावर बूड टेकत पाटलानं विचारलं.

“बिगरटाइम नि बीइम, आमच्य् खातच् आशलं हाय म्हंता पाटील्लऽ, तीतं कोंच्या टायमाचं काय काम उट्येल्ल, त्येचा काय न्येम नाय्.” नि फक्कन् हसत तो बोलला, “तुमाला तर समदं ठाऊकच हाय; येत्यान् ईल्ल?”

“होंदू!” अन् पाटलानं पृच्छा केली, “पर हावालदारघोळ, काम तरी कसलं काढलाईसा आज?”

तसं हवालदारानं आपल्या छातीवरील डाव्या खिशातून एक छोटी नोटबुक काढली आणि मग ओठाला बोट लावून थुंकीच्या ओलाव्याने एक-एक पान निर्बुद्धपणे उलटत राहिला, नजर पानापानांवर लिहिलेल्या कन्नड अक्षरांची जाळी फापलू लागली अन् मग इच्छित पान हाती येताच ‘हंऽ’ करून समाधानाचा उद्‌गार काढून म्हणाला,

“शिरपती बाळू हजारे, धोंडीराम भीमराव कडाकणे आनी ज्ञानदेव बापू फराकटे ह्या तिघा पोरास्नी धरून आणाय् सांगिटलंय् सायबानं.”

“ही काय तशी पोरं न्हवंत, चांगली हुडागत वाढल्याली हैत – ईस-ईस,

बावीसच्या उम्रीची.'' मघापासून दाबून धरलेल्या उत्सुकतेपोटी पाटलानं विचारलं, ''पर साहेब कशाबद्दल...? कशाबद्दल धरून आणाय् सांगिटलंय् पोरास्नी? काय झंगाट तरी काय हाय ?''

''ते काय ठाऊक नाय् मला. आपुन तर हुकमाचं ताबेदार.'' हवालदार तर काही दूम लागू द्यायला तयार नव्हता. ''लगुट होग नि तरकोन बाऽ.''

''ते 'तरकोन बा' बी काय नको हावालदारघोळ,'' पाटील म्हणाला, ''आम्हास्नी म्होरं घालून, दान्याला दिऊन तुम्ही रिकामं हुशीला; आनी ती लोकंमतोर आमच्यावर दांत ठेवूनश्यान ऱ्हातील– पाटलानंच आमच्या पोरास्नी धरून दिलं म्हणून. तवा गावातल्या गावात हुबा दावा नको, तुम्हीच चला आम्हासंगट, म्हंजे आम्हास्नीबी जरा बोलाय् जागा झाली. काये बज्याऽ, व्हय् का न्हाई...?''

''व्हय् तर!'' तराळानं पाटलाचाच सूर ओढीत म्हटलं, ''हावालदारसाहेब, पाटील म्हंत्यात ते बरोबर हाय बघा. उगंच गावातल्या गावात आम्हांस्नी डूक नको, तुम्हीबी चला संगट.''

''मन्नश्यांवंऽमगऽनं, तुम्हास्नी काय तितं कोण दाबून धरतंय् म्हणावं.'' असं बोलत हवालदार उठला न् म्हणाला, ''चला तर– लगुट लगुट.''

आणि तिघांचं ते लटांबळ निघालं...

नदीवरच्या त्या पूलवजा कट्टीवरून माणूस गावात शिरलं की, उगावतीकडील गल्ली लागे. उजव्या हाताला, गल्लीच्या तोंडावरच एक उंच पिंपळाचं झाड होतं, झाडाखाली मारुतीचं देऊळ – पश्चिमेकडे तोंड करून उभं असलेलं, ह्या गल्लीच्या भर मध्धासाला जैनांची बस्ती आणि तसंच पुढं गेलं की, पार वरच्या टोकाला अंबाबाईच्या देवळाचा उंच कळस नजरेत भरे. जैनांच्या बस्तीचा कळस उंच की अंबाबाईच्या देवळाचा कळस उंच, असा संभ्रम पाहणाऱ्याला पडावा, असे हे दोन उंच कळस वर आभाळ कोरायला गेलेले... बस्तीच्या भोवताली जैनांच्या घरांची मायंदाळी दाट अन् अंबाबाईच्या देवळासमोर भरपेट पटांगण. त्यात दोन दीपमाळाही. या पटांगणाच्या समोरच्या बाजूसच चावडी...

या उगावतीकडील गल्लीच्या पिछाडीस, मावळतीस गांवदरीचं लांबच लांब असं वावर पडलेलं आणि त्याच्या पलीकडे भुंडा माळ चढत गेलेला. तशीच नजर पुढे धावली का, मल्लय्याच्या डोंगराचं, भुईतनं अवचित मध्येच वर आल्यागत वाटणारं टेंगूळ नजरेत भरे. माळाच्या पार टोकाला शाळेची

नवी इमारत बांधलेली होती आणि समोरील घसारतीला एक गल्ली अजगरावानी सुस्त पडल्याली. हिला माळावरची गल्ली म्हणून नाव पडलं होतं. उगावतीच्या गल्लीत बहुतेक सारे जैनधर्मीय राहत, तर या माळावरल्या गल्लीत विशेष करून मराठे राहत... अलीकडे मात्र या गल्लीच्या टोकाला, शाळेकडील बाजूस चौगुलेअण्णा व कद्रेअण्णा या गावातील जैनधर्मीय तालेवारांच्या मोठमोठ्या तंबाखूच्या वखारी व प्रशस्त बंगल्यागत आलिशान घरं झाली होती. हे जैनधर्मीय लोकच जमीनजुमला बाळगून ऊस व तंबाखूच्या पैशाने गब्बरगंड झाले होते आणि यांच्या शेताभातात व तंबाखूच्या वखारीतून चाकरी, रोजगारी करून, तसेच, त्यांच्या जमिनी रैत म्हणून तिजाईने वगैरे कसायला घेऊन बहुतेक मराठ्यांचा प्रपंच चाले...

माळावरील गल्ली आली. गल्लीच्या सुरुवातीस कडाकण्याची व फराकट्याची घरं होती. ईळभर रानातनी तंबाखूची लावण करून नुकतीच कुठं धोंडीराम व ज्यानू परतल्याली होती. तोंवर या सरकारी टोळांची धाड. दोन्ही ठिकाणी जवळपास सारखेच नाट्यप्रवेश...

''कचेरीकडं बलीवलंय् फौजदारानं!''

''फौजदारानं? ते आनी कशापाई?''

''कुणाला म्हाईत. तुमच्या पोराला घिऊन यायला सांगिटलंय एवढं खरं.''

''च्यामारी, आमचं प्वार कुणाच्या अध्यात न्हाई, मध्यात न्हाई, नि तरीबी कशाला बलवून आनाय् सांगिटलंय् म्हणावं? काय गुन्ना केलाय् त्येनं?''

''आता त्ये तितं गेल्यावरच कळणार की. तुम्हास्नी जेवढं म्हाईत हाय, तेवढंच आम्हास्नीबी! बरं, द्या लावून पोराला, टैम हुतोय.''

शेतात लावण करताना चिखल–माती लागून मळलेल्या कपड्यानिशीच धोंडीराम व ज्यानू निघाले. त्यांनाही समजेना –आपल्या हातून असा काय गुन्हा झाला? बोलावून आणायला फौजदारानं खास टोरिंग पाठवावी म्हंजे काय? डोस्कं खाजवूनही त्यांना कळेना, काय चुकलं आपल्या हातून?

तिथून गल्लीतनं खालती नदीकडं कासराभर गेलं की, हजाऱ्यांच्या श्रीपतीचं घर लागे.

''मास्तर हैत का घरात?'' श्रीपतीचा बाप गावातल्याच शाळेत मास्तर होता.

''हाय की हो मी.'' खुद्द बाळू मास्तरच बाहेर येत म्हणाला, ''काय हो पाटील, काय कामगिरी काढलासा, ह्या आव्येळी?''

''शिरपा हाय का घरात?''

''न्हाई. त्यो तंबाखूचं तरू आणायला गेलाय् पाव्हण्यांच्या गावाला – मांजरीला.'' आणि बाळू मास्तरनं विचारलं, ''श्रीपतीकडं काय काम काढलासा?''

''हे हावालदारसाहेब आल्यात तालुक्यास्नं, पेशल गाडी काढून. फौजदार साहेबांनी शिरपाला बलवून आणाय् सांगिटलंय म्हणं.'' पाटील बोलला.

''पन त्यो तर आज सक्काळीच गेलाय् मांजरीला. त्येचा आजूनबी पत्त्या न्हाई.'' आणि मग 'काय करायचं आता,' असा चेहरा करीत मास्तरनं पाटलाकडे अन् हवालदाराकडे पाहिलं.

''हुडगा नस्ला तर नसू दे, तुम्ही तर चला मग.'' हवालदार म्हणाला. पोरगा नसला तरी, पोरग्याचा बाप तरी. नगाला नग हजर केला म्हणजे झालं...

''मी कशाला आनी... पोरगं आल्यावर आणून हजर करतो की...'' पडेल आवाजात मास्तरनं सांगितलं... आपणाला पोलिसांनी धरून नेलंय, ही वार्ता उद्या गावभर झाली म्हणजे आपली काय इज्जत राहील? – त्या कल्पनेनेच मास्तर मनोमन गांगरून गेला होता.

''मग तसं सांगा चला तर साहेबाला!'' नोकरीत आजवर निरनिराळ्या ठिकाणी बदली होऊन मास्तर जसा दहा गावचं पाणी प्यालेला होता, त्याप्रमाणेच हवालदारही. त्याने मास्तरच्या तंगड्या त्येच्याच गळ्यात अडकविण्याचा प्रयत्न सुरू केला, ''साहेब आनी मला फैलावर घेईल – पोरगं न्हवतं तर पोरग्याच्या घरातलं कुणी तरी का आणला न्हाईसा, आसं म्हणाय् लागंल, तवा चला तुम्हीच. काय सांगायचं ते सायबालाच सांगा चला, आनी या चला परत.''

ऐकून मास्तरलाही क्षणभर सुचेना – काय बोलावं, काय करावं ते. तो विचारातच पडला...

''होगून नडीऽ मास्तर,'' हवालदारानं तगादा लावल्याच्या आवाजात म्हटलं.

तसा मास्तरचा नाईलाज झाला... जवळच्या खुंटीवर अडकविलेली टोपी आपल्या बोडक्या डोईवर ठेवत मेलमुश्या आवाजात तो म्हणाला,

''चला तर.''


साऱ्यांना आपल्या पोटात रिचवून टॅक्सी परत निघाली...

हेडलाइट्सचा प्रकाश परत अंधाराला चिरत जाऊ लागला...

◆



# पुस्तकाच्या पानांतून




## तिंगाड

**महादेव मोरे**

*सामाजिक, राजकीय, मानसिक विसंगती...*
*विनोदाच्या शिडकाव्याने उडतात हास्याची कारंजी*

### शिकार

बक्कळ म्हैनाभर तरी झाला म्हणा आता, मालकाच्या मनात शिकारीला जायाचा नालसाब उड्या माराय लागला हुता. मालक आदीच हाय तिरशिंगराव. त्येच्या मनानं एक घेटलं म्हंजे मग त्यो त्येच धरून बसणार! मी पडलो त्येचा डायवर. त्यामुळं त्येच्या मागुमाग मलाबी लंबे-लंबे करीत जायची पाळी. आता डायवर म्हनल्यावर तुम्हा श्यारगावातल्यावानी काय एकच तेवढं मोटार चालवायचं काम

आस्तंय म्हंता? मळ्यातला ट्याक्टरबी मीच चालवायचा, नदीवरल्या मोटार पंपाची देखभालबी मीच करायची; झालं तर मालकाची गावात पिठाची एक गिरण हाय तिच्यावरचा डायवर कवा रजेवर जाईल तवा डायवर म्हणून मीच गिरणीवर ऱ्हायचा!

'कानी-कानी कित्तानी, म्हशीनं घातला उत्तानी' ही असली सारी तऱ्हा म्हणंनासा. ती ऐकून तुम्हाला कट्टाळाबी ईल म्हणा. तर घाबरू नका. ती सांगाय काही असा मी आलकट-पालकट घालून बसलो नाही... तर आज सांगणार हाय, मालकाच्या शिकारीची कहाणी...

आमचा मालक म्हाईतच हाय न्हवं तुम्हास्नी, कसा गौरेड्यागत आडवा-उभा जंक्शन सुटल्याला आनी नावबी कसं तसंच जंक्शन नि पावरबाज-आप्पासाहेब शिवाजीराव पाटील, रंग असा काळारोम. तवंदी भरमाप्याच्या डोंगरातला काळा करंद फत्तरच चालाय लागलाय असं वाटावं. कापशी माटाचं पायतान पायात घालून ते चार्र ऽ चार्र वाजवीत रस्त्यानं चालला की बायाच काय, पन बापयांचंबी काळीज धुक्‌धुक्‌ धुक्‌धुक्‌ करावं! पंचेचाळिसाच्या वर वय झालंय नि आताशा गड्यानं थोडी ढेरीबी सोडलीया. डुईवरल्या काळ्याभोर जंगलात आदनंमदनं पांढरा वाख चमकू लागलाय. भैया न्हावी दाढीला आलं म्हंजे मिशीच्या कंगलातली चांदी उपडून काढतं; पण डुईवरली उपडायची म्हंजे, टक्कलच पडायची बैदा! या गौरेड्याला टक्कल? म्हंजे हसायचीच पाळो की हो! च्या बायली, माज्याबी डोस्क्यात एकेक आयडियाच येतीया हं, त्या भैऱ्या न्हाव्यावानी!

तर शिकारीचा कार्यक्रम ठरला. आयीतवारी हितनं सुटायचं, दिवसाचा गोंडा फुटायला निघायचं, चराट सुटायचं, ते दुपारचं दोन-बाराला जोगाई गाठायचीच. तिथं मालकाचा साडू हाय दौलतराव विश्वासराव शिंदे. त्येला मालकानं कळविलं हुतं - 'दुपारच्या जेवणाच्या टिप्पनाला आयीतवारी आम्ही हाजर हुताव्; तवा एक कवळा लुसलुशीत पालव मारून ठेवा!' तिथं गेल्यावर मग नळीवर आडवा हात मारायचा न्‌ एक गरगरीत झोप काढायची; ते जोगाईच्या जंगलात सुटायचं. एखादं हारण मिळालं तर बेसच, न्हायतर भोर्ली कवडं, व्हलं, ल्हावर असला मोडखुर्दा गोळा करायचा मग! एखादा डुक्कर टिपायचा चानस गावला तर वाघ मारल्याचा तोरा भोगायचा.

तरीबी आयीतवारला आजून तीन दिवसांचा अवधी व्हता... मालक म्हणाला, ''धोंडबा, जीप घिऊन निपाणीला सूट. बापू मेस्त्रीच्या ग्यारेजमदी न्हेवून चेकअप करून घिऊन ये. ही गाडी आदीच हाय हाटमुऱ्या रांडंवानी, कवा कुठं वांदं काढून रुसून बसंल ते काय सांगता यायचं न्हाई! व्हय, वाटंत आनी खुळांबा नको वाळ्ळा!''

आयीतवारी एक-दीडच्या टिप्पणाला जोगाईत. साडूच्या दाराम्होरं गाडी हॉल्ट करून हॉर्न वाजविला. आमची वाटच बघत बसल्याला साडू लगी बाहीर आला.

''सक्काळठावनं आजून पत्त्या न्हाई; तवा म्या म्हणलू, की गाडीलाच काही वाटंत...'' किरमिड्या साडूचा सारा रुबाब त्येच्या झुंड मिशीत हुता. बैलवारं सुटलं तर त्या जुंधळ्याच्या घाटावरल्या पाल्यागत उडून जाईल, असा साडू असला तरी त्येला देवानं नरडं काय लावलंतं म्हंता? गावाच्या ह्या टोकाला बोलला तर त्या टोकाला ऐकू जावावं!

''गाडीला आनी काय हुतंय हो त्येच्या बायली! दोन रोजामागंच लिप्पाणीला न्हिवून चेक-अप करून आन्लीया नी!''

''तरीबी मशीन म्हंटल्यालं हाय! कवा काय हुईल ते काय सांगता येतंय? हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ!'' साडूच्या मिश्या इचकल्या.

च्या बायला ऽ कुणाला कशाचं हासू ईल, ते काय सांगता येत न्हाई बघा! समजा, आक्सिडेन्ट हुन आम्ही हास्पिटलमदी हात-पाय मोडून घिऊन पडलो अस्तो तरी ह्यो साडू, भेटायला ईवून म्हणाला अस्ता, ''मला वाटलंतंच! हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ!''

आता जेवतानाबी कोण हासंल काय? तरीबी ह्येचं आपलं हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ सुरूच. मी डायवर म्हणून मला वायलं, आपुनला वायलं, हे असलं काय आमच्या मालकाच न्हाई बघा. आसं कुठं भाहीर गावाला गेलाय् नि जेवायचा परसंग आला तर मांडीला मांडी लावून जेवायला बसवून घिल, तर असं आम्ही तिघंबी जेवत हुताव. मालक साडूला म्हणाला, ''दौलतराव, तुम्हीबी चला की, ह्या डाव आमच्या संगंसंगं शिकारीला!'' आनी मालकानं काड्दिशी नळी फोडली.

'न्हाय बा, आमच्या लागीचं काम न्हवं त्ये! गोळीचा काड्दिशी आवाज

आल्यावर खांद्याला लावल्याली रायफल सोडून आम्ही धाड्‌दिशी मागं पडणार! हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ'' न्‌ मग साडू बोलला, ''आनी खरं सांगू काय आप्पासाबराव तुम्हास्नी, आपुनला तर बाबा जंगलात फिरणाऱ्या जनावरांची नि पाखरांची हत्या करणं आवडत न्हाय! त्या मुक्या जीवांनी आपलं काय घोडं मारल्यालं आस्तंय्‌ म्हणून त्येनला आम्ही मारायचं?''

''दौलतराव, शिकार करणं ह्यो एक नादच हाय. मान्साला काय ना काय तरी नाद असावा हो!'' नि मालकानं रश्शाचा आकबंद वाटका तोंडाला लावला न्‌ पाण्यावानी पेट्टात सप्पीवला!

''आप्पासाबराव तुम्हाला कोंचा नाद न्हाई हो? हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ''

मालकाला कोंचा नाद नव्हता, ते काई मला आठवंना! उलट मालकाला ज्येचा ज्येचा नाद हुता, त्येची एक मालगाडीच नद्रंसमोरनं फिरत गेली!

जेवल्यावर मालकानं मधल्या माळीत तलंगा लावला न्‌ थोड्याच वेळात त्यो घोरू लागला. आगीनगाडीच्या शिटीसारखा आवाज त्येच्या तोंडातनं येऊ लागला. म्होरल्या बैठकीच्या खोलीत मोबी आडवा झालो ते झालोच! बायली, ही पैलंची घरं वाव-वारभर रुंदीच्या भिंतीची. उन्हाळ्यातसुद्धा एअरकंडिशनवानी गारवा टिकून ऱ्हातोय न्‌ काय!

''अहो डायवरसाब, अहो...'' साडूचा आवाज कानावर आला नि माझी झोप- मोड झाली. मी डोळं किलकिलं केलं, तर साडूनं दंडाला धरून लडालडा हालविलं न्‌ म्हटलं, ''अहो, उठा की! हितं झोपा काढायला आलायसा का शिकारीला?'' ''शिकारीला? आमच्या बानं आनी कंच्या काळी शिकार केली हुती? शिकार मालक करणार, तवर आम्ही हितं झोपाच काढणार की!''

''मग, तुमच्या मालकाला तरी उठवा जावा की! मघाठावनं आम्ही तरी उठवून दमलो; पन गडी डोळं उघडायचं काय चिन्न न्हाई!''

'तिथं भी आनी काय बोंबल्याकार करणार!' असं मनातल्या मनात म्हणत उठलो. मालक झोपला हुता तिथं गेलो. आडीमल्लय्याचा डोंगर पडावा, तसा त्यो आडवा पडल्याला. त्या डोंगराला हालवायची खटपट करीत म्हटलं,

''मालक ऽ अहो मालक...!''

''कोण रं त्यो साडंसुक्काळीचा?'' मालकानं खॅस मारली.

"मीच की हो, तुमचा डायवर! अहो, उठा की मालक, शिकारीला जायाचं

न्हाई?"

"शिकारीच्या आईची गांड कूट! एवढी निर्मळवानी झोप तरी काढतो!!" अखेर साडू न् मी नेट धरला; तवा कुठं मालक नाईलाजानं उठला. 'आ ऽ ऽ आ ऽ ऽ आ ऽ ऽ असा लांबलचक जंक्शन आळस देत त्येनं आंग डावी-उजवीकडं करीत कडाकडा करीत मोडलं; न् म्हंतोय कसा,

"बायली, किती उश्शेर झोपलो मी! धोंड्या, उठीवशील का न्हाई मला? शिकार करायला आलाव का झोपा काढायला आलाव हितं?" मी कपाळावर हात मारून घेतला! दुसरं तरी काय करणार? अशा टैमाला कपाळावरचा हात तोंडावर तर मारून घेता येत न्हाई!

आम्ही जंगलात पाय टाकला तेव्हा दुपारच्या उन्हाचा ताव बराच कमी झाला हुता; तरी अजून शिळोप पडाय बक्कळ अवधी हुता.

मालक म्हणाला, "पाय म्होरं टाकलाय खरा. आता हात हालवीत काई परत यायचं न्हाई. किनिट पडूस्तोवर काय न्हाई काय तरी मारू नि परत येऊच. उद्या सकाळीमतोर यरवाळी उठून पार त्या किल्ल्यापतोर सारं जंगल ईचरायचं!"

"हो, हो, जाऊ या की मालक. आपल्या तकदीरमदी आसंल तर वाघसुद्धा गावंल!!"

तसा मालक खॉ खॉ करून हसला न् म्हणाला,

"असल्या जंगलात आता कुठला आलाय वाघ गावसायला? आपलं तकदीरच गांडू. म्हटलंच न्हवं - तकदीर गांडू तो क्या करे पांडू? आता आम्ही वाघ सिनिमात न्हाय तर सर्कशीतच बघायचा!"

"जिल्ह्याच्या गावातबी सर्कस आलीया म्हणं मालक, चार रोज झालं म्हणं, एकदा काढा की ट्रीप, तेवढी हाणून यिऊया!"

"बेन्या, मला काय लागलंय नि तुला काय लागलंय?" आसं बोलून मालक म्हणाला, "किनिट पडायच्या आत एखादा गवारेडा ऱ्हावूं दे, निदान ससा तरी मारून न्हीवू या. न्हाय तर तसंच हात हालवत परत गेला तर पाव्हण्यांच्यात नापतच का न्हाई आपली? आनी हे तर आपल्या म्हेवनीचं घर, मग?"

''व्हय, काय तरी मारून न्ह्यायला पायजे, म्हणून तर तुम्हासंगं हात हालवीत मीबी यायला न्हाई, तर जीपमधलं हे हांडेल बरोबर घेटलंय. सावज ईवू दे तर जरा माऱ्यात - पेट्टास पेट्ट एक असा टिप्पीरन्ना देतो, की त्ये आडवंच व्हावं!!'' भीमानं गदा कशी खांद्यावर घेटली आसंल तसं मी हांडेल खांद्यावर घेटलं व्हतं. बायली एक अस्सा देतो ठेवून, की यंव्व!

''बायली, इतकी वर्सं शिकार केली, पन वाघ काय मारला न्हाई!'' नि निःश्वास सोडीत मालक बोलला, ''गड्या, तेवढी एकच ईच्छा ऱ्हायली, बाकी काय न्हाय!''

''आता त्यो वाघबी तुम्हाम्होरं कसा ईल व्हो, मला मारा म्हणून? तुम्हीच त्येच्या मागावर ऱ्हायाय पायजे, त्येला गाठाय पायजे; पायजे का नको?''

''ते खरं हाय धोंड्या, पन आपलं तकदीर पडलं न्हवं! तकदीर गांडू, तो...'' ''क्या करेगा पांडू?''

''बायली ऽ तुलाबी पाटच झालं की हे!'' न् मालक घोड्यागत खिंकाळू लागला.

काटंकांगुण्यांचा नि बोराटीचा झाडोरा... केकताडाच्या झाडांची दळ... ही सारी व्हलं गावायची ठिकाणं, पन तिथं एकबी व्हला औषीदाला नद्रं पडत नव्हता. एका तरवाडाच्या फोंदोऱ्यावर मतोर एक पानकोंबडा बसल्याला दिसत व्हता. मालकानं नेम धरू-धरूस्तंवरका म्हंजे त्यो भाइर फार्रदिशी उडून झाडोऱ्याच्या आडगारात दिक्पाल झाला.

डोंगर असा अजगर पडल्यागत सुस्त पडल्याला. पोर मावळतीला किल्ला हुता. किल्ल्याच्या डोस्क्याला टण्णू आल्यागत जोगाईचं शिखर लांबनं दिसत हुतं. शिखराच्या टप्पारावर जोगाईचं देऊळ... मालक चालता-चालता माट्दिशी एका देवदाराच्या बुंध्याशी बसला नि पटक्याच्या शेमल्याने कपाळावरील घाम पुशीत बोलला, ''दमलो बाबा आता! बसतो वाईच. ईस्वाटा घेतो जरा. आयला ऽ पैलंगत शिताफीच ऱ्हायली न्हाई आंगात!''

''कशी ऱ्हाईल मालक! पैलं एक उमत हुती, अंगात रग हुती. तवा शिताफीनं एका झपाट्यात चार-चार, पाच-पाच मैलांचं जंगल तुडवत

व्हतासा. आता एका हिसक्यात तेवढं चाललासा तर तुरयंडी ईवून पडशीला.''

आनी मीबी मालकाजवळ खाली बसलो. समोरच वाव-दीड वाव अंतरावर करवांदाची जाळी अशी आडवी पसरली व्हती. हिरव्याकंच करवांदांनी ती लहडली व्हती. त्या हिरव्या करवंदास्नीबी एक तऱ्हेची आंबट-तुरट चव असती. दात रवताच दुधागत पांढरा शिप्पोट चिक्क आतनं भाहीर पडतोय... त्या आठवणीनं तोंडात चुळाच सुटल्या! न राहवून मी जवळच पडल्याला एक दगोड उचलला नि त्या जाळीवर भिर्कावीत म्हणालो,

''करवांदं तर काय लागल्यात, तिच्या आयला!''

तसं डरकाळ्या फोडतच वाघाचं एक धूड जाळीतनं भाहीर आलं न् आमच्या दिशेनं झेपावलं!

खरं सांगायचं तर, पयल्याझूट बावचळूनच गेलो बघा नि मग सावरलो. अंगात ईर आल्यागत झालं म्हणंनासा! हांडेल उचललं ते समोर दिसल्याल्या धुडाच्या डोस्क्यात पुऱ्या ताकदीनं साऽण्णदिशी हाणलं! तसं ते चारी मुंड्या चित झालं... इवळल्यागत तोंडातनं घुरघुरघुर आवाज काढत टाचा घासाय लागलं...

मी मागं वळून बघिटलं तर हिकडं मालकानं माकडागत एका झेपेत देव- दाराचा निम्मा बुंधा चढल्याला न् हातातली रायफल खाल्ती जमिनीवर त्येनं तशीच टाकल्याली!

मी म्हनलं, ''उतरा आता खाल्ती मालक! आता तसं काय भ्या न्हाई!'' तसा मालक सुर्रदिशी खाली आला नि म्हंतोय कसा, ''मर्दाच्या, मी काय भ्यालोय? पन एकदम वाघच समोर आल्याला बघून जरा काचबार-बाचवार झालं म्हनंनास!!''

''बरं, आता तर गोळी घाला त्येला! उगंच आपलं उकिरड्यावर लोळल्याल्या कुत्र्यागत टाचा घासाय लागलंय!'' नि मी म्हणालो, ''आगदी काळजाचा नेम धरून गोळी घाला बघा मालक!''

तशी मालकानं रायफल उचलली व ईच्यारलं, ''काळीज कुटं आस्तंय वाघाला?''

''डोस्क्याखाली आस्तंय् जणू!'' म्या म्हनलं.

''हां, राईट, बराबर! डोस्क्याखाल्तीच पोपटीपतोर कुठंतरी आस्तंय!'' मालकानं ठीक बरोबर सांगितलं आनि रायफल पोझिशननं धरून फुडल्या

फऱ्याच्या वर एक नि मानंत एक गोळी घाटली...

तशी वाघानं मान टाकली आनी त्यो खरोखर जीव जाऊन मेला!

''धोंड्या, तू सूट आता जोगाईला. साडूला बलवून घिऊन ये!!'' मालक म्हणाला. ''साडू म्हणाला, 'वाघाचं मला भ्या वाटतंय' तर त्येला म्हणावं, ईस्वा- सातलं चार-सा गडी तरी लावून दे. हे धूड तरी उचलून न्हायला पायजे का नको? आनी हे बघ, 'वाघानं अशी झेप घाटली; मालकानं ती चुकीवली; तसं ते झाडाच्या बुंध्याला टक्करून खाली कोसळलं; तसं चल्लाखीनं मालकानं पेट्टास पेट्ट दोन गोळ्या घाटल्या, तसं ते एकदम थंडगारच झालं!!'' आसं सांग, ''न्हाय तर खरं सांगून माजी लायकी ड्याम् करशील, काय म्हंतो?''

साडूच्या मळ्यात आणून धूड ठेवलं. गावात न्हीवून आनी उगंच बोंबाबोंब नको म्हटलं. मग गावात यिऊन जेवलाव. निघताना मालकानं घरातल्या साऱ्यांचा निरोप घेटला न् म्हटलं, ''आता आम्ही मळ्यात जाऊन घटकाभर डुलका काढताव ते पयली चांन्नी उगवायला उठून तसंच पैसपरभारी चराट सुटताव. दिवस म्हवराय म्हंजे गावात पावलं पायजे. वाघ मारलाय ते काय उगंच व्हय? तिथं मिरवणूक काढायची हाय! सकाळला उठून दुपारला पोचलाव तर मिरवणूक कोण बघणार? तवा सारी रानाशिवारात गेल्याली. व्हय का न्हाई हो दौलतराव?'' जन्माला ईवून पयल्यांडावच वाघ मारल्यानं मालक बरोबरच खूश दिसत हुता!

'वा: वाः, तुमची एवढी वाजतगाजत मिरवणूक निघायची नि आम्ही हितंच ऱ्हायाचं? ते काय न्हाई - आम्हीबी येणार बघा, तुम्हासंगं! एवढं जवळचं साडभाऊ म्हटलंय कशाला? आँ? अशा टैमाला आम्ही जवळ असायचं न्हाई, तर आनी कवा? आँ? हॅ ऽहॅ ऽ हॅं ऽ''

''तुम्हीच तेवढं मिरवायचं आनी आम्ही काय घोडं मारलंय व्हय?''

मालकाच्या मेव्हणीनं रुसवा सूर काढला.

''आगं घोडं न्हाई. आम्ही सगळ्यांनीच वाघ मारलाय म्हणायचं आता! हॅ ऽहॅ ऽ हॅ ऽ! साडू म्हणाला, ''आनी काय हो, आप्पासाबराव, तुम्हीबी तिथं सांगायचं शिकारीच्या वख्ताला मीबी तुम्हासंगं जंगलात हुतो म्हणून!''

''आम्हीबी यायचं न्हवं संगट?'' मेव्हणीनं आपला पाइन्ट काय सोडला

न्हाई!

"हां, हां, चला चला. सगळीच जाऊया. वाघाबरोबर मिरवूया! उठल्याबरोबर जीप घिऊन हिकडंच येताव् आम्ही!" मालक म्हणाला.

मालकानं होरा केला, तसंच झालं. पयली चांन्नी उगवायला जे सुटलाव ते दिवस उंबलायला गावाच्या हद्दीत हाजर! पन मरगूबाईच्या माळावर आलाव नि 'माज्याकडं काय न्हाई' म्हणत गाडीनं जे जागा धरला, ते ती काही म्होरं जाईना! आता हिच्या आयला ...

"शेवटी केला का बल्ल्या!" मालक बोलला, "तरी माज्या मनात सौंशय हुताच - कायच न हुता ही बया एवढ्या लांब आली तरी कशी?" आनी रुसवा सूर काढीत त्यो म्हणाला, "आता एवढा दांडगा वाघ मारायचा नि गावात चालत जायाचं म्हंजे लायकी ड्याम्‌च का न्हाई आपली? ते कायबी हुंदे - मी काय गाडीतल्या वाघाजवळनं खाली उतरणार न्हाई. तवा तू आसं कर धोंड्या, गावात जा, नि धा-ईस मान्सं घिऊन ये. गाडी ढकलतच गावात न्ह्याची आनी ढकलतच मिरवणूक काढायची!"

तसा मी गाडीतनं उतरलो न् पाठ फिरवून लंबे लंबे करीत गावाकडं निघालो.

"आनी हे बघ..." मागनं मालकाचा आवाज आला, तसा थांबलो. मालक जवळ आला. गाडीतल्या साडूला व मेव्हणीला ऐकू जाणार न्हाई अशा आवाजात कुजबुजला, "तंवर तराळाला गावात दवंडी द्यायला सांग...तसंच आम्ही यायच्या आधी, गावच्या वेशीत लेजीम, वाजाप, गुलाल-चिरमुरं - मिरवणुकीची ही सारी सामगिरी जय्यत तय्यार पायजे. तलाठ्याला निस्तं सांग तू; त्यो न्हाई, त्येचा बा झक्कत तयारी करतोय."

तर अशी मिरवणूक कशी झोकात निघाली आसंल, ते तुम्ही वळीकलाबी अश्शीला म्हणा!

रात्री मालकानं वाड्यावर आकबंद बकरं मारलं नि गावजेवण घाटलं. पयल्यांदाच वाघ मारला हुता न्हवं त्येनं, मग?

जीपगाडी गावभर ढकलून-ढकलून मेल्याल्यास्नी राती दोन-दोन बाटल्या पयल्या धारंची पाजली नि सा-सा 'दुरूण' बकऱ्याचा रस्सा पाजला, तवा

कुठं ते जिवंत झालं म्हणनासा!

"अहो, थांबा की, चाल्ला कुठं आजून. संपलं न्हाई सारं; सारी मज्ज्या तर फुडंच हाय."

तर काय सांगतो; मी पंगतीतनं उठलो, तसं मालकानं मला जरा बाजूला बलीवलं नि खासगी आवाजात सांगिटलं, 'हे बघ धोंड्या, आसाच मळ्याकडं सुट नि रत्नव्वाला सांग - 'आज हिकडं लै गोमगाला उस्सळलाय. तवा आज काय मालक मळ्याकडं ईत न्हाईत, तर उद्या येतील,' म्हणावं, काय?"

"बरं, सांगतो जाऊन घ्या. ह्यो सारा कालवा थंड व्हायलाच बारावर एक हून जाईल!"

तसा समाधानानं मुंडी हलवीत मालक बैठकीच्या सोप्यावर गेला नि तिथे जमलेल्यास्नी नव्यानं आपल्या वाघाच्या शिकारीची कानी सांगाय लागला...

आता तुम्ही ईच्चारशीला - रत्नव्वा कोण? तर रत्नव्वा हे एक पाखरू हाय; पारवाळ म्हणा, कबूतर म्हणा; पण हाय गिर्रेबाज. भल्याभल्यांची नजर वाकडी व्हावी आसं. चालता चालता मागं वळून बघावंसं वाटण्यासारखं! तर ह्या रत्नव्वा जोगतिणीला मालकानं ठेवून घेटलंय. किती वर्सं झाली बरं? हां, सा-सात तरी सहज झाली असतील.

सांगाय गेलो तर रत्नव्वा जरा घुश्शातच हुती म्हणंनासा. ठेवल्याल्याच बाया मारू शकतील, आसा हिसडा मानेला मारीत बोलली, "आता एवढा दांडगा वाघ मारायचा नि हितं भेटायला न्हाई यायचं म्हंजे? एवढंऽ गावजेवान घाटलं, पन आमची आठवन झाली का त्येनला? आलीकडं नाव- नाव माया पातळ व्हायला लागलीया म्हणंनास! मी कोण लागतोय त्येंची? का हाक्काची, का लग्नाची? कितीबी केलं तर ठेवल्याली रांड..." आपल्या आपुन एकटंच बोलत ऱ्हावावं, तशी ती बोलत व्हती.

"बरं हाय. मी चलतो तर!" मदीच मी म्हणालो.

"का गडबड? आजून लगीनबी व्हायला न्हाई? का कोण हाय वाट बघणारी?"

तसा मी लाजलोच बघा न् मान खाली घालत म्हणालो, "न्हाय बा ऽ आजून मी कटबंद गडी हाय!"

तसं तिनं म्होरंहून दार लावलं नि माझ्या दिशेनं झेप घेतली.

"अहो, अहो, पन मी... मी साधा..."

"अरे गप्प!" तिनं मला येंगतच घेटलं न् म्हटलं, "मान्साला येळ पडली म्हंजे भुकंला कोंडा नि निजंला धोंडासुद्धा चालतोय!"

'धोंडा न्हवं, धोंड्या!" मी दुरुस्ती केली.

"आता मला तर काय ठावं हो कोण, कुठं नि कुणाची शिकार करायला कवा न् कसं बसल्यालं आस्तंय ते!"

तिथनं निघताना म्हणाली कशी,

'धोंड्या, तुजा मालक नुसताच फोपसा हाय, तुजंमतोर पावरबाज काम हाय!"

आता म्हंजे... म्हंजे या कोड्याच्या बोलण्याचा अर्थ काय हो?

दुसऱ्या रोजी वाड्यावर गेलो तर मालक आजून पलंगावर लोळत्यालाच. तसाच लोळत त्यो म्हणाला, "बायली, मघाधरनं उठावं-उठावं म्हटलं तर आंगातला आळसच जाईना! धोंड्या, जरा पेपर तर आण जा रे चावडीतनं; दोन रोज सांदाच मिळाला न्हाई बघाय. जरा चाळतो तर."

चावडीत जाऊन दोन दिवसांचं पेपर आणलं, तरी ह्यो गडी अजून पलंगा- वरच! जवळच्या स्टुलावर पेपर ठेवलं न म्हटलं, "हं ऽ हे घ्या मालक!"

मालकानं त्यातला एक पेपर उचलून नद्रंसमोर धरला नि एकदम टाणदिशी हातरुनावर उठूनच बसला आनी मग म्हणाला, "हिकडं ये धोंड्या-वाच बरं ह्ये, काय छापून आलंय त्ये!"

मी पेपरात नजर रोवली नि वाचू लागलो -

'गवलापूर : ९ : येथील इंटरनॅशनल सर्कसमधील वाघ...'

"धोंड्या, लेका मनातल्या मनात वाच, सारंच पामटुळं फोडू नकोस!"

तसा मी मनातल्या मनात वाचू लागलो. 'रात्री शेवटचा खेळ संपल्यावर पिंजऱ्याचे दार नीटपणे बंद न केल्याने वाघ सुटून गेला आहे. कुणाला आढळल्यास कृपया कळवावे; योग्य बक्षीस देऊ. तसा वाघ म्हाताराच होत आल्याने विशेष कुणाला दगा वगैरे करणार नाही; तरी पण जनतेने सावध राहावे व तो पकडण्यास आम्हाला मदत करावी.'

वाचून मी मालकाकडं आनी मालक माझ्याकडं पाहतच ऱ्हायलो!!

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# उपचार तन मनाचे

**जो मर्चंट**

अनुवाद

**श्रीनिवास वैद्य**





मन आणि शरीर यांच्यावर एकत्रितपणे केल्या जाणाऱ्या उपचारांबद्दलची सर्वांगीण माहिती

**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# माणसं अशी आणि तरीही

**रवींद्र भगवते**




बहुरंगी माणसांच्या बहुढंगी कथा

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तकाच्या पानांतून




## यशवंतराव चव्हाण
### आठवणी-आख्यायिका

**लक्ष्मण माने**

लक्ष्मण माने यांनी सुप्रिया सुळे यांना लिहिलेल्या पत्रांतून उलगडलेलं यशवंतराव चव्हाण यांचं व्यक्तिमत्त्व

दिनांक २६/०१/२०१२

चि. सुप्रिया, सप्रेम जय भीम.

हे वर्ष यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दीचं वर्ष. त्या निमित्तानं मी पहिलेले, अनुभवलेले आणि ऐकलेले यशवंतराव त्यांच्या नातीला सांगावेत आणि तरुण मुलांशी संवाद साधावा; चव्हाणसाहेबांची लाखो नातवंडं यानिमित्तानं चव्हाणसाहेबांना समजावून घेतील, ही अपेक्षा. तुझ्याशी केलेला सुसंवाद म्हटलं तर आजही खासगी कानगोष्टीसारखा

आणि म्हटलं तर सर्वांसाठी खुला.

मी अगदी लहान होतो. माझा लहानपणचा अवतार काय सांगू तुला? आईनं मागून आणलेला लांब बाह्यांचा सदरा. तो पार घोट्यापर्यंत जात असे. त्यानं चड्डी असली काय, नसली काय– फार फरक पडत नसे. दोन्ही हातांच्या बाह्यांनी नाक पुसत हिंडायचं– या मळ्यातनं त्या मळ्यात. शिव्यांचं तर काय सांगू? अख्ख्या निरगुडीत एकही माणूस नसेल, ज्यानं मला शिव्या दिल्या नव्हत्या! अवखळपणा, खोडकरपणा आणि नसत्या उठाठेवीही रोज शिव्या खायला लावणाऱ्याच. आकाबाईच्या म्हशी आन् बकाबाईला उठाबशी! कुणाची तरी कुरापत काढायची, मग शिव्याच शिव्या. तरी बरं, दोनच कान होते. ते दोन्ही इतक्यांदा उपटले गेलेत की, जे उरलेत ते आयुष्यभर साथ आहेत याचंच आश्चर्य. तुला सांगतो, निरगुडी हे माझं गाव. फलटणच्या संस्थानकाळात फलटणला भुईपाटानं पाणी पुरवणारं बागायती गाव. तीन आळ्यांमध्ये वाटल्यालं. सारं गाव सस्त्यांचंच. वरची आळी म्हणजे मानसिंग सस्त्यांची आळी. बहुतेकदा तेच सरपंच असायचे. मधली आळी किसना पाटलांची आणि खालची आळी म्हणजे रावसाहेब धन्यांची. पांढरीवरली वस्ती वेगळी. रावसाहेब धनी म्हणजे गावचे कारभारी. चिरेबंदी, दुमजली, चौसोपी, भला मोठा वाडा म्हणजे धन्यांची शान. सगळ्या गावात त्यांचा मोठा मान. मैंदाळ नैतिक धाक साऱ्या गावाला. वाड्याच्या म्होरं प्रचंड मोठं मैदान. मैदानात सारी गावची पोरं खेळायची. वाड्याच्या बाजूला राखणीला नेमलेला कैकाडवाडा, रामुसवाडा, मांगवाडा. वाड्याच्या भोवताली तटबंदीसारखा उभा. वाड्याची भावकी मोठी. त्यानं गावात त्यांचा दबदबा. रावसाहेब धनी आणि त्यांचा थोरला मुलगा रामभाऊ हे डाव्या विचाराचे कम्युनिस्ट. पाटलाचा वाडा गावात आहे, गाव पाटलाच्या वाड्यात नाही, हे पाटलानं ध्यानात ठेवावं आणि गावानं पाटलाचा आब म्हणजे आपला आब आहे असं मानावं– असं कायबाय ते म्हणत असत. रामभाऊला त्यानं मॅट्रिकपर्यंत शिकवलं होतं. आमच्या गावात मॅट्रिकएवढं शिकल्यालं कुणीच नव्हतं. त्यामुळे रामभाऊ साऱ्या गावचे कारभारी.

पाटलाच्या वाड्याच्या पाठीमागे नरसिंग सस्ते गुरुजींचा वाडा. आता तू म्हणशील, हे वाडापुराण कशाला लावलंय? ते यासाठी की, आळ्या एका-एका पार्टीला वाटल्याल्या होत्या. वरची आळी, मधली आळी काँग्रेस पार्टीची. त्यांची भावकी वेगळी. खालची आळी पांढरी, सारी मागासवर्गीय मंडळी रामभाऊ सस्त्यांबरोबर लाल बावटंवाल्यांची. आता माझ्यासारख्या पोरास्नी

काय? पक्ष काय आन् पार्टी काय– गर्दी जमली की हुंदडायचं आन् दंगामस्ती करायची. त्या वेळी प्रभातफेऱ्या आणि संध्याकाळी प्रचारफेऱ्या निघत असायच्या. प्रभातफेरी निघाली की, सर्वांत पुढं बैलजोडी औताला जुपल्यावानी. खांद्यावर औतं, अर्धा खोचा खोचून शेतकरी औतामागं उभा. अंगात पांढरी पैरण, डोक्यावर गांधी टोपी, पायात करकरीत वहाणा– असा सजवलेला शेतकरी. बैलांचंही तसंच. तुला झुली म्हाईती आहेत? फार छान असतात. मखमली, मखरावर वेलबुट्ट्या, कशिदा काढलेल्या. मधे-मधे महिरपी काचा, काचांचे गोल-चौकोनी तुकडे फार सुंदररीत्या गुंफलेले असतात. चारी बाजूंनी छान गोंडे असतात. रंगीबेरंगी गोंड्यांनी सजलेल्या या झुली बैलाच्या पाठीवर घातलेल्या असायच्या. कपाळालाही फार सुरेख बाशिंगं असायची. बैलांची शिंगं तासून रंगवलेली. शिंगाला गोंड्यांच्या शेंब्या. दोन्ही पांढरीशुभ्र टोकदार शिंगांची खिल्लारी जोडी. अंगावर नजर ठरायची नाही असं पाणी. बेंदराला सजवावं तशी सजवलेली. काय सांगू तुला, हे बैल बघताना फार धमाल यायची. बिशाद नसायची कुणाची त्यांच्यापुढे जायची. या नटलेल्या बैलांच्या पुढे डफडं, ताशा, पिपाणी, हलगी वाजायची. बैलांच्या मागं पोरींची, पोरांची रांग. सारी शाळेतली. त्याच्यामागं चारदोन बाया गावच्या पुढारणी. मग बाकी सारी मोठी माणसं. म्हातारे-कोतारे-तरणे साऱ्यांच्या हातात तिरंगी झेंडे. आमच्या या प्रभातफेरीत सारेच मोठ्यामोठ्यानं घोषणा द्यायचे. आम्ही सारी पोरं घोळक्यानं सारी एका दमात म्हणायचो, 'जयऽ'. मंग 'भारतमाता की जय, महात्मा गांधी की जय, पंडित जवाहरलाल नेहरू की जय'. मंग यायचं 'यशवंतराव चव्हाणांचाऽ', आमचा कोरस म्हणायचा, 'विजय असोऽ' 'यशवंतराव चव्हाण आगे बढो, हम तुम्हारे साथ है।' यातला प्रत्येक जय, प्रत्येक विजय आम्ही सारे बेंबीच्या देठापासून ओरडायचो. त्यात रांग मोडली की, मोठा माणूस बसायच्या जागेला रट्टा द्यायचा. 'रांग मोडायची नाय, रांग मोडायची नायऽ' असं दमात घ्यायचा. घोषणा पुढं सुरू व्हायच्या. अगं, एक गंमत फार भारी. आमची प्रभातफेरी जेव्हा बोळाबोळातनं जायची, आम्ही 'जय' म्हटलो की, कुत्री भुंकत अंगावर यायची. बोळकांडं इतकी बारीक की, समोरून कुत्री घुसली तर सारी परवड व्हायची. त्या बोळातनी पायातच गटारं असायची. 'जय' म्हणता-म्हणता पोरींच्या अंगावर चिखल कसा जाईल, अशा बेतानं घाण पाण्यात पाय मुद्दाम आपटायचा. पाण्याची चिपळी पोरींच्या अंगावर उडाली की, फिदीफिदी दात काढायचे. मग पोरींनी 'किरड्याऽ मुडद्याऽ दिसंना व्हय रं तुला?' म्हणून शिव्या

दिल्या, तरी दुर्लक्ष करायचं आन् चालू लागायचं. मोठी माणसं पुढं रेटायची. अखंड बोळातून आमचं फेरीचं काम चालूच असायचं.

काँग्रेसची खूण बैलजोडी. 'बैलजोडीच्या चित्रावर शिक्का मारा', 'यशवंतराव चव्हाणांना विजयी करा', 'पंचवार्षिक योजना हीच आमची घोषणा', 'राज्य कसं घेतलं गांधीनं? मूठभर मिठानं, मूठभर मिठानं', 'तिरंगी झेंडा जिंदाबाद'... सारं गाव दणाणून जात होतं. फार मोठी फेरी असायची. सकाळपेक्षा संध्याकाळी फेरी मोठी निघायची. सारा गाव जागवायचा. बाया, पोरी आपापल्या उंबऱ्यावर, दारात, अंगणात, बोळाच्या तोंडाला घोळक्या-घोळक्यानं बगत उभ्या राहायच्या. ज्याच्या-त्याच्या तोंडी 'बैलजोडी', 'बैलजोडी', 'यशवंतराव', 'यशवंतराव', 'यशवंतराव' असायचं. बैलजोडीचा असा दणक्यात प्रचार असायचा. 'अहो बाबूराव, जेवणाची काय सोय आहे का?', 'अहो काकासाहेब, काही खाण्यापिण्याची व्यवस्था आहे का?', 'काय राव, ही काय जत्रा हाय का चव्हाणाच्या पोरीचं लगीन?', 'ही इलॅक्शन हाय इलॅक्शन, ध्यान ठीवून असा. इरोदक ह्याच्यातलं कायतर करतील. आपली-आपली माणसं ताब्यात ठिवा, आन् बैलजोडी'... 'आरं बाबा, इंग्रज पळालं, ह्येच मोठं झालं. वाटत होतं का जात्याली म्हणून? आजून आमच्या कानांत त्यांच्या बुटांचा आवाज हाय. ज्यो बेइमानी करंल, त्यो नरकात जाईल. साडी, माडी, जेवणावळ्या, पत्रावळ्या, घोटबर दारू ह्याज्यापरीस दारातला सावकार गेला, ही का बारकी गोष्ट हाय? कवातरी ती तांबड्या तोंडाची माकडं जात्याल आन् आसं स्वातंत्र्य मिळंल, सपनात होतं का? मर-मर मेहनत केली, पॉट भरत होतं का? आता स्वराज आलं, कुणीबी उपाशी निजायचं नाय. साळा आल्या, शिक्शान आलं, म्हणजे सगळी भरून पावत्याल बगा. घटकीच्या घोटासाठी असं आयसंग जाऊन बापाला रामराम करायचा नसतो. बाप बापच असतो बाबा. एवढी घटना काय शेन खायला लिहिली? यशवंतराव तुरुंगात गेला, तवा काय त्याला सपान पडलं व्हतं? आरं, फलटणच्या तुरुंगात व्हता; पोटचा गोळा गेला तरी तुरुंगातनं बाहीर नाय आला. माफी नाय मागितली. त्याला नाय द्यायचं मत, तर मग कुणाला?' चावडीवरल्या गप्पांना असा ऊत यायचा. चव्हाणांचं मोठेपण अशा खऱ्या-खोट्या आख्यायिका घेऊन जन्माला आलं होतं.

एक प्रभातफेरी संपली की, विरोधकही फेरी काढत असत. त्यांच्या हातात लाल रंगाचा, विळा-हातोडा असलेला झेंडा असायचा. त्यांच्या घोषणा वेगवेगळ्या. माणसं फार नसायची. बारकीसारकी पोरंबी नसायची. चारदोन बाया आन्

पाचपन्नास पुरुष. सारे प्रौढ, गंभीर. गंमतजंमत नाही, दंगामस्ती नाही, वाद्यं नाहीत, गोंगाट-कालवा नाही. मोठमोठ्यानं 'लाल बाबटे कीऽ जयऽ', 'शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा विजय असो', 'गरिबांचं राज्य आलंच पाहिजे', 'शेतकऱ्यांचं राज्य आलंच पायजे', 'क्रांतिसिंह नाना पाटलांचा विजय असो', 'कॉम्रेड हरिभाऊ निंबाळकरांचा विजय असो' असे नारे देत फिरायचे. त्या वेळी या लाल बावटेवाल्यांच्या सायकलवरूनही प्रभातफेऱ्या निघत. एखाद्या सायकलच्या नळीवर बसून, हातात लाल झेंडा घेऊन मीही घोषणा देत असे– 'लाल बावटे की जय'. हे लाल बावटेबाले आम्हाला चिरमुरे-फुटाणे द्यायचे. या फेरीत बहुतेक सारे मागासवर्गीय. रामभाऊ सस्ते आणि त्यांच्या विचाराची माणसं. सारे शिस्तीनं चालायचे. सगळ्यांच्या हातांत लाल बावटे. किती सालची निवडणूक, कोण जाणे? काँग्रेसच्या फेरीत आम्ही पोरं मोठ्या संख्येनं असायचो. फेरी संपली की, सर्वांना लिमलेटच्या दोन-दोन गोळ्या मिळायच्या. लाल बावटावाले अशा काही गोड गोळ्या द्यायचे नाहीत. त्यांचं आपलं लाह्या-फुटाणे. त्यांच्या घोषणा बी जड, लांबच्या लांब. आपलं पब्लिक भारी. हिकडं गेलं तरी 'जय' म्हणायचं, तिकडं गेलं तरी 'जय' म्हणायचं. कशाची 'जय', कुणास ठाऊक? साऱ्यांचीच जय. पण, आजही महात्मा गांधी म्हटलं की, आपोआप तोंडात येतं, 'जय!', 'यशवंतराव चव्हाणांचा..' म्हटलं की, आपोआप तोंडात येतं, 'विजय असो.' इतका दीर्घ काळ चव्हाणसाहेबांचा आमच्या साताऱ्याच्या माणसांशी संबंध होता. हयात असेपर्यंत ते आमचे नेते होते. दुसरा कुणीही आमच्या लोकसभा मतदारसंघात उभा राहिला नाही आणि निवडूनही येऊ शकला नाही. विजयी व्हायचे ते चव्हाणच. चव्हाणसाहेबांचं साताऱ्याच्या मातीशी हे जे नातं होतं ते अखेरपर्यंत. त्यांची आठवण झाली नाही, असा एकही दिवस निदान माझ्या आयुष्यात जात नाही. जेवढं आठवेल, तेवढं तुला कळवत जाईन. तळागाळातून शिखराला पोहोचलेल्या एका अवलियाची गोष्ट– ज्याचं नाव होतं 'यशवंत'.

तुझा,

लक्ष्मणकाका

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

# ॲन आयलंड

**कॅरन जेनिंग्ज**

अनुवाद

**संकेत लाड**




एकांड्या आयलंडवरचा एकटा माणूस... त्याच्या अस्मिता आणि एकांताच्या जुगलबंदीतला अस्वस्थ करणारा संघर्ष.

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# तवायफनामा

**सबा दीवान**

अनुवाद


**डॉ. शुभदा कुलकर्णी**




मनस्वी कलाकार ते अभिजात संगीत, नृत्याच्या अनभिषिक्त सम्राज्ञी, कालपटलावर नैतिकानैतिकाच्या संकोची चौकटीत जगणं हरवलेल्या तवायफांची हेलावून टाकणारी गाथा.

**किंमत : ९५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तकाच्या पानांतून




## विमुक्तायन

**लक्ष्मण माने**

*भटक्या-विमुक्तांचे मनाचा थरकाप उडविणारे, परिघाबाहेरचे जीवन, जातपंचायतीचे वाढते प्रस्थ, शासनाने केलेल्या उपाययोजना इ. ...भटक्या-विमुक्तांच्या जीवनावर टाकलेला संशोधनात्मक प्रकाश*

**शडीदेवीचा नवस :**

शडीदेवी म्हणजे वृक्षदेवी व वृक्षदेवीस केलेला नवस फेडणे कैकाडी महत्त्वाचे मानतात. जंगलात जाऊन बाभळीच्या, शिंदीच्या किंवा अन्य

जंगली लाकडांच्या फोकांपासून कमानीच्या आकाराचे छोटेसे देवळासारखे पाल तयार केले जाते. त्यावर पांढरा कपडा टाकला जातो. त्या ठिकाणी गारेचे चार दगड व तीन साधे दगड किंवा गारेचे तीन दगड व चार साधे दगड घेऊन चोळीच्या खणावर ते दगड देव्हाऱ्याप्रमाणे केलेल्या पालात मांडून घ्यायचे. 'शडीदेवीचा नवस' हा संकटातून वाचविण्यासाठी केलेला असतो. समजा, घरात एखादे लहान मूल आजारी पडले असेल, तर त्या मुलाला बरे वाटू दे म्हणून नवस बोलला जातो. त्याप्रमाणे नवस फेडावा लागतो. शडीदेवीला काळी पाट द्यावी लागते. या पाटीस कोणत्याही प्रकारचा पांढरा किंवा तांबडा असा ठिपका असता कामा नये, ती पूर्णपणे काळीच असली पाहिजे. ती जर काळी नसेल तर देवीला चालत नाही,असे मानतात. प्रथम देवीचे दगड करून मांडल्यावर देवीची पूजा करून देवीला साधा नैवेद्य दाखवितात. नैवेद्य दाखविल्यावर देवीच्यासमोर बळी द्यायला बकरे उभे करतात. जर देवीला बकरे मान्य नसेल तर बकरे सुस्त उभे राहते, ते मान वगैरे काही हलवत नाही. यावरून देवीचे अजून काहीतरी द्यायचे राहिले आहे, असे समजले जाते. त्या वेळी देवीची माफी मागायची, काय चूक झाली असेल,तर त्याची चौकशी करून पुढच्या खेपेस दुरुस्त करीन, असे म्हणायचे व बकऱ्याने मान झटकली तर देवीला बकरे मान्य झाले असे मानायचे. देवीनेच मान्यतेचा कौल दिला, असे मानून बकरे कापायचे. बकरे कापल्या जागी जरासा खड्डा करायचा. त्यात रक्त पडलेले असते, ते मुलाच्या हाती देऊन नैवेद्य दाखवायचा आणि मग मुंडके व खूर देवीच्या पुढ्यात नेऊन ठेवायचे. सर्व मटणाचे कालवण तयार करायचे. सर्व सागुती तिथेच खायची असते, त्यातील काहीही घरी न्यायचे नसते. त्यातून जर उरले तर ते एकाच कुत्र्याला खाऊ घालायचे. हे सर्व झाल्यावर पुन्हा देवीला, सुखी ठेवण्याबद्दल विनंती करून नारळ फोडून घरी परत यायचे. येताना पाठीमागे अजिबात बघायचे नाही, असा दंडक आहे. नवस बोलणाऱ्याशी ज्यांचा संबंध नसतो, त्यांनी मागे राहून देवीला धूप दाखवून शिल्लक उरलेले बकऱ्याचे मुंडके न्यायचे असते.

पुरुष दैवतांमध्ये कैकाडी खंडोबाला भजतात. ते खंडोबास आपला जावई समजतात. 'मुरुग' हा देव दक्षिणेकडे कैकाड्यांचा देव मानला जातो. कारण मुरुगाने कैकाडी कन्या वल्लीशी विवाह केला आहे. या कारणाने कैकाडी समाज खंडोबाला आपला देव समजतात. खंडोबासही सुख लागण्याबद्दल

नवस बोलले जातात.

'कैकाडी' ही भटकी जमात असल्यामुळे त्यांना रानावनांत, गावाबाहेर स्मशानात, गावंदरीस अथवा दिसेल त्या ठिकाणी उतरावे लागते. या जागेवर उतरताना ते आपल्या देवांची तिथे प्रतिष्ठापना करतात. देवच आपले रक्षण करतात व करणार आहेत यावर कैकाड्यांचा जबरदस्त विश्वास असतो. कैकाड्यांनी ज्याला देव मानले आहे, त्यासच ते भीतात. कैकाडी स्त्री किंवा पुरुषांच्या अंगात 'शिवकळा' येतात व अशा देव अंगात येणाऱ्यांकडून भविष्य सांगितले जाते. देवाच्या झालेल्या कोपाबद्दलची माहिती मिळते. भुताखेतांवरही कैकाड्यांचा विश्वास आहे. इतर भुतांना कैकाडी भीत नाही, परंतु स्वतःच्या जातीतील व्यक्तीचे भूत झाले व त्याने झपाटले तर कैकाडी सर्वांत जास्त घाबरतो व ते भूत उतरवण्यासाठी मांत्रिक सांगेल त्या पद्धतीचा उतारा करण्यास तयार होतो.

## पाचवी पुजणे किंवा सटवाई पूजन :

कैकाडी जमातीमध्ये बारशाचा विधी करण्याची पद्धत नाही. परंतु मूल जन्माला आल्यानंतर मूल सुखरूप जन्मले म्हणून त्याची पाचवी करण्याची पद्धत आहे. या पाचवीच्या दिवशी सटवाई देवीची पूजा केली जाते. पाचवीला बोकड कापला जातो. ज्या दिवशी पाचवी असेल त्या दिवशी एक काळी पाट किंवा काळा बोकड आणायचा. काळ्या रंगाचाच बोकड असला पाहिजे, जर बोकडाच्या अंगावर एखादा पांढरा किंवा अन्य रंगाचा ठिपका असला, तरी तो बोकड पाचवीस चालत नाही. देवीच्या पूजनासाठी गहू, कणकेचे दिवे, गोडेतेल, पाच नारळ, पाने, सुपारी, लिंबू, हिरव्या बांगड्या, कुंकू, चोळीचा हिरवा खण, हळद इत्यादी वस्तू घेऊन जोंधळ्याचे पीठ, मटणाचे कालवण तयार करावयास लागणारे पदार्थ घेऊन, काळ्या बोकडासह सायंकाळी अंधार पडायच्या सुमारास वसाहतीपासून दूर जायचे. बरोबर स्त्रियांना अजिबात घ्यायचे नाही. कारण या पूजेस स्त्रिया चालत नाहीत. सटवाईची पूजा करण्यासाठी एखादे झाड बघून योग्य जागा निवडायची व सर्व सामान तिथे उतरायचे. प्रथम आजूबाजूचे दहा-बारा खडे गोळा करायचे, ते पाण्याने धुऊन घ्यायचे व ते ओळीने मांडायचे. त्यांवर हळद-कुंकू, बांगड्या ठेवायचे व कणकेचे दिवे लावायचे व बरोबर आणलेली सटवाईची लहानशी प्रतिमाही त्या दगडांबरोबर पूजतात. तिच्यावरही हळद, कुंकू लावून तिच्यासमोर खण, नारळ, पान-

सुपारी, लिंबू सारे मांडून घेतात. उदबत्ती लावून नारळ फोडतात. अशा प्रकारे देवीची पूजा झाल्यावर ज्याच्या घरात मूल जन्माला आले असेल, त्याने देवीच्यासमोर बोकड कापायचा. बोकड कापल्यावर येणारी पहिली रक्ताची धार देवीसमोर शिंपडतात. मुंडी व खूर देवीसमोर ठेवतात. मटण शिजवून मटणाचा नैवेद्य देवीला दिला जातो. पंक्तीस बसणाऱ्या सर्वांना दारू दिली जाते व सर्व घरी परत निघतात, तेव्हा पुन्हा पाठीमागे पाहत नाहीत. घरामध्ये जाण्याअगोदर नदीच्या, ओढ्याच्या ठिकाणी जाऊन अंघोळ करतात आणि मगच घरी जातात. प्रत्येक जण पाचवीचा विधी न चुकता करत असतो.[१३]

कैकाडी जमात ही मातृदेवता मानणारी जमात आहे. स्त्री-देवतांचे प्रस्थ यांच्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते. जवळजवळ सर्वच पूजाविधी व जत्रा या स्त्री-देवता प्रसन्न करून घेण्यासाठीच केलेल्या दिसतात. शडीदेवी (वृक्षदेवता), उरअम्मा (लक्ष्मीदेवी), वासलअम्मा (दारदेवी), फिरस्ती अम्मा, आरकुल अम्मा (जलदेवी), म्हशायताई अम्मा, देव्हरं अम्मा (कुलदेवी) या देवतांना कैकाडी भजताना दिसतात व या सर्व देवींचे नवस फेडण्याची पद्धतीही वर उल्लेखलेल्या 'शडीदेवी' किंवा 'अंगणजत्रा' व 'सटवी पूजना'प्रमाणेच असतात.

**कैकाड्यांची लग्नपद्धती :**

कैकाडी समाजामध्ये लग्न जुळवताना एकाच गोत्रामध्ये येणाऱ्या आडनावांत लग्ने होत नाहीत. लग्न जमवायचे असेल तर ते 'कवाडी' व 'सातपाडी' यांच्या कुळांतच केले पाहिजे. कवाड्या-कवाड्यांमध्ये लग्न केल्यास ते लग्न कायदेशीर मानण्यात येत नाही व अशा प्रकारे लग्न करणाऱ्यांना जातिबहिष्कृत केले जाते. कैकाडी समाजात मुलीच्या लग्नाचा प्रथम मान हा मामाचा असतो. मामाच्या घरी मुलगी देण्याबद्दल पहिल्यांदा विचारावे लागते. जर मामाने मुलीवरील हक्क सोडला, तरच दुसऱ्याशी सोयरीक करता येते. मुलाचा बाप ज्या घरची मुलगी करावयाची असेल त्या घरी काही पंच घेऊन जातो. मध्यस्थांमार्फत, 'मुलगी देणार का?' असे मुलाकडील लोक मुलीच्या बापाला विचारतात. मुलीच्या बापाला स्थळ पसंत असेल तर पाहुणे बघायला येतात. मुलगी पसंत पडली, तर मुलाचा बाप पाच पाने, सुपारी व सव्वा दोन रुपये मुलीच्या बापाच्या हातात देतो, ही रक्कम व पान-सुपारी दिली, की मुलीवर नवऱ्याकडील मंडळींचा हक्क प्रस्थापित होतो. यास कैकाडी 'फारदूट' असे म्हणतात. एकदा 'फारदूट' झाले, की मुलीच्या बापास किंवा मुलाच्या बापास आपला विचार

बदलता येत नाही, मुलीवर मामाचा हक्क असतो, मामाची हरकत नसेल तर मामासही पाच पाने व सुपारीचा मान दिला जातो. यास 'सुलाकार' म्हटले जाते, लग्न नक्की झाल्यावर साखरचिरडीचा कार्यक्रम (साखरपुडा) करतात. या वेळी पुरणपोळीचे जेवण घातले जाते. आनंद व्यक्त करण्यासाठी दारू प्यायली जाते. या वाङ्‌निश्चयास कैकाडी 'मांडीहुटी' असे म्हणतात. साखरपुड्याच्या दिवशी मुलीला साडी-चोळी नेसवली जाते.

पूर्वी इतर समाजाप्रमाणे कैकाड्यांमध्ये मुला-मुलींची लग्ने लहान असतानाच केली जात असत. साधारणतः मुलगी दहा वर्षांची झाली, की तिचे लग्न होई. मुलगासुद्धा मुलीच्यापेक्षा थोडासा मोठा असे. काही काही वेळा पाळण्याला बाशिंग लावूनही लग्ने केली जात असत. कैकाडी जमातीमध्ये पूर्वीच्या काळी पाच ते सात दिवस लग्नसमारंभ होत असत. परंतु आता एक-दोन दिवसांतच लग्ने उरकली जातात. लग्न हे मुलीच्या दारात केले जाते. लग्नाची न्याहरी म्हणून नवीन पानावर पिठले-भात द्यावा लागतो व संध्याकाळी नवऱ्याकडील मंडळींनी वऱ्हाडास पुरणपोळीचे जेवण घालावे लागते. लग्नाच्या दिवशी मुलीच्या बापाला मुलाच्या मंडळींनी जेवण करण्यासाठी साडेअकरा पायली गहू, पोळ्यांच्या जेवणासाठी लागणारे साहित्य-डाळ, गूळ, तेले याबरोबर खर्चासाठी सव्वाएकवीस रुपये द्यावे लागतात. या देण्यात आलेल्या शिध्यास 'पुटूल देणे' असे म्हणतात. 'कैकाडी जमाती'मध्ये ब्राह्मण लग्न लावीत नाहीत. जाणत्या पंचाकडून लग्ने लावली जातात. लग्न लागले, की मुलाचा बाप डुक्कर मारून मटणाचे जेवण घालतो आणि लग्नाचा समारंभ संपतो.

मामाला मान म्हणून मावळखंड द्यावा लागतो. त्यास कैकाडी 'सुल्ला' असे म्हणतात. सुल्ल्याची रक्कम ही ठिकठिकाणी सोईनुसार ठरलेली दिसून येते. नवरीच्या आजा-आजीला नवऱ्याकडील लोकांनी कपडे करावे लागतात व 'आजीचिरी'चा मान दिला जातो व मुलीच्या आईस पोटझाकणीचा आहेर दिला जातो.

## जातिबहिष्कृत करणे :


कैकाडी समाज कैकाडी म्हणून अत्यंत बंदिस्त स्वरूपाचा आहे. जमात-पंचायत व जमातीचे आजअखेर घालून दिलेले रूढ नियम जर जमातीच्या सदस्याकडून मोडले गेले, तर त्याला जमातीतून बहिष्कृत केले जाते. उदाहरणार्थ, एखाद्याने सगोत्री विवाह केला असेल, त्या पुरुषास शिक्षा दिली जाते. स्त्रीला

शिक्षा देण्याची पद्धत नाही. डुकराची विष्ठा, मलमूत्र गोळा करून एका टोपलीत भरतात. एक लहानशी झोपडी बांधतात. या झोपडीस समोरासमोर अशी दोन दारे असतात. ज्याने चूक केली असेल त्याच्या डोक्यावर डुकराच्या मलमूत्राने भरलेली टोपली देतात. या टोपलीत इतर लोक पाणी ओतावयास सुरुवात करतात. त्यामुळे टोपलीतील सर्व घाण टोपली ज्याच्या डोक्यावर असते त्याच्या अंगावर ओघळत असते. अशा अवस्थेत त्याची गावभर मिरवणूक काढतात. मिरवणूक झाल्यावर शिक्षेसाठी मुद्दाम बांधलेल्या झोपडीच्या एका दरवाजातून आत नेतात व दुसऱ्या दरवाजाने बाहेर काढतात. तो बाहेर आला, की झोपडी पेटवून देतात. झोपडी जळल्यानंतर तो शुद्ध झाला असे मानले जाते. अशा प्रकारची गोष्ट कैकाडी समाजात चुकूनच घडते. जर कैकाडी जमातीमधील व्यक्तीने परजातीतील व्यक्तीशी संबंध किंवा सोयरीक केली, तर तिला जमातीमधून बहिष्कृत करतात. जर तिने जमातीची माफी मागितली नाही तर जमात ती व्यक्ती मेली असे समजून तिचा दिवस घातला जातो. कैकाडी जमातीमध्ये जातीच्या रक्षणासाठी म्हणून जरी जमातीबहिष्कृत करण्याचे नियम असले तरी पंचांनी निर्णय दिल्यानंतर बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीस कैकाडी समाजात बरोबरीचे स्थान दिले जाते. अशा स्त्री-पुरुषांना या जमातीमध्ये घेण्याच्या पद्धतीस 'उरसांड घेणे' असे म्हणतात. या उरसांडामध्ये पुरुष असेल तर त्यास 'देल्लक' म्हणतात व स्त्री असेल तर तिला 'पूकी' असे म्हटले जाते. अशा उरसांड व्यक्तीस जो कैकाडी घेणार असेल, तो जर 'कवाडी' असेल तर त्याने त्या व्यक्तीस 'सातपाडी' कैकाड्यांच्या मांडीवर द्यावे लागते व अशा रीतीने त्याचा नवा जन्म झाला असे मानण्यात येते. त्या व्यक्तीने ज्याने मांडीवर घेतले असेल त्याच्या नावाने 'करदोडा' बांधावा लागतो. अशा प्रकारे विधिपूर्वक बाहेरील व्यक्तीस जमातीमध्ये घेतले जाते व त्याच्या मुलांना जमातीची मान्यता मिळते. अशा प्रकारे मान्यता मिळाल्यावर या जमातीत उरसांड झालेल्या स्त्री किंवा पुरुषास जमातीच्या इतर सदस्यांप्रमाणे जमातीचे सर्व अधिकार व मान मिळतात.

◆



# पुस्तकाच्या पानांतून




## उद्ध्वस्त

### लक्ष्मण माने

*मुलगा व्हावा या अट्टहासापायी एखादी उधळते जीवन... तर अजाणतेपणाने लावून दिलेल्या लग्नाने एखादीची होते होरपळ... तर भावंडांच्या शिक्षणासाठी एखादी स्वत:च्या जीवनाचा करते यज्ञ... वास्तवतेचं परिमाण लाभलेल्या आणि हेलावून टाकणाऱ्या कथांचा संग्रह*

### झाकली मूठ

'मुंबई गं नगरी बडी बाका, जशी रावणाची दुसरी लंका, वाजतोय डंका' अशी मुंबई शेटजी-भटजींची, भांडवलवाल्यांची,

बंगले-गाड्यावाल्यांची, मलबार हिलवर झुलणाऱ्या वाऱ्याची, गगनचुंबी इमारतींची, सागरावरल्या तुफान लाटांनी भिजून चिंब होणाऱ्या हौशागौशांची, जगण्यासाठी चिंध्या पांघरलेल्या विराट झोपडपट्ट्यांची, शेंबूड नाळी गटारांची, गटारांवर हागून गू घाण केलेल्या रस्त्यांची, प्लॅस्टिकच्या कागदांनी शेकारलेली, टिनपाटांनी झाकलेली, मध्येच विजेच्या खांबाखाली वाकलेली, धारावी.

कॅंप, सायन झोपडपट्ट्यांचा समुद्र, चारी बाजूनं गरिबी, लाचारी, बेकारी, भिकारी, बेरोजगारीने कळकटलेली, मळकटलेली. गरिबीच्या लाटांनी लुबडलेली मुंबई. हातावर पोट घेऊन देशभरातनं माणसांचा महापूर या सागरतीरावर आपापलं नशीब काढायला आलेला असतो. प्रत्येकजण आपापल्या दोन येळच्या जेवणाची भ्रांत घेऊन या शहरात येत असतो. लाखो भुके कंगालांना ही मायावी नगरी आपल्यात सामावून घेते, आधार देते, अन्न-पाणी आणि उगड्यावरला फुटपाथ देते. कुणीही अन्नासाठी तडफडून मरत नाही. काही ना काही मिळतच राहते. माणसांचे तांडे येतच असतात. रेल्वेने येणारे, रस्त्याने येणारे हजारो-लाखो जीव घावंल तिथं आपला प्रपंच थाटत असतात.

आबा पाटील तीस वर्षांपूर्वी या गावात आला. या महानगरीनं त्याला आसरा दिला. सुरुवातीला लोखंडी जत्यात आबा कामाला लागला. हमाली करायचा. पाठ विकायची. हमालांच्या पुठ्यात आबा रमला. लोखंडी जत्यावरनं तो बोरीबंदरला गेला. बऱ्यापैकी पैकापाणी घावला. मुंबईतला कष्टकरी माथाडी कामगार हमाली करणारा पाठविक्या, सातारा, सांगली, कोल्हापूरकडला मराठी माणूस, कष्टासाठी आलेला, पोटासाठी आलेला माणूस. आबा या साऱ्यांत मिसळून गेला. शिवाजी बापूच्या संगतीनं हमाली सोडली. माथाड्यांच्या कामगार संघटनांत आबा  काम करायला लागला. सवताची गाडी घितली. एक ट्रक झोकात चालायला लागला. आता आबानं लगीन केलं. आस्तुरीला घिवून आबा धारावीच्या झोपडपट्टीत राहायला लागला. झोपडपट्टीतल्या गल्लीत आबाचा ट्रक आता उभा ऱ्हाया लागला. ट्रकमध्ये कामगार घालायचं आन् आपून ड्रायव्हरशेजारी बसून ट्रान्सपोर्टचा उद्योग करायचा. व्यापारी बांधल्यालं असायचं. त्यानं कामाला तोटा नव्हता. पैका मिळत गेला. आबाची गरिबी खलास झाली. ट्रकच्या वाहतुकीच्या धंद्यानं आबाचं उकाळ पांढरं झालं. आंगठाबहादूर आबा आता पुढाऱ्यातनी बसू लागला. पांढऱ्या धुपाट कापडातला आबा आता

डोस्क्यावर काँग्रेसची पांढरी टोपी तिरपी घालून, हातात सोगा धरून, कोल्हापुरी वहाणा वाजवीत हिंडू लागला. म्हंजी लोक त्याला आबासाहेब म्हणू लागले. आबाचा दरारा वाढू लागला. आबा अतिशय नेक, प्रामाणिक, काडीचं व्यसन नाही. कुणाच्या कसल्या लफड्यात पडायचं नाही. आपुन भले आपलं काम भलं. नित्यनेमानं शिवाजी बापूच्या युनियनमधी ऱ्हायाचं. बापू सांगील ते काम इमानदारीनं करायचं, बास्स, येवढंच राजकारण. बाकी सारं ध्यान पैका कमवायचा. तसं मुंबईत त्यो लय हैरान असायचा. ही माणसांची गर्दी, लाखान् माणूस बगून त्याला कवा पळून जाईल साताऱ्याला आसं व्हायाचं. पर काय करतुया, 'पोट गांडू, क्या करेगा पांडू!' पोटासाठी मुंबईतल्या नरकात ऱ्हायाचं.

त्यो मनानं कायम कृष्णेच्या काठावरल्या त्याच्या शेतात असे; पण देहानं मुंबईकर. मुंबईच्या माणसांत हाळूहाळू आबा मिसळून गेला. पोटपाणी पिकलं. कस्तुरा, त्याची बायको, पोराबाळास्नी सांबाळायची. साळंत घालायची. बगता बगता आबाला पोरगा झाला. तिघं ल्याक, दोगी लेकी. खाणारी तोंडं वाढली तसा आबाचा पैशापाण्याचा कारबारबी वाढला. एका ट्रकाचं दोन झालं. दोनाचं चार झालं, चाराचं आठ. येल मांडवाला गेला. माणसं राबायला लागली. आबाला जेवायला येळ घावंना. आबा लय बिजी झाला म्हणा. रातीचा दिस, कष्ट, कष्ट आन् कष्ट. घाम गाळायचा. आबाच्या दारात आता पाच-पन्नास हमाल राबत व्हते. त्यांचं कमी-जास्त सारं आबा आन् त्याची कस्तुरा बगत. दिवस सुकात जात व्हतं.

आमदानी जशी वाढायला लागली तसं आबानं भावाला मुंबईला आनला. त्याची पोरं मुंबईला आली, एकाला दोगं झालं. आन् आबा बगता बगता चार चाकाच्या गाडीत कवा बसायला लागला त्याजं त्याला बी समाजलं न्हाय. आता मुंबई चाकावर पळती ही गोष्ट आबाला समाजली. गावाकडची माणसं आबाला आता शेट म्हणू लागली. आबा साहेबाचा शेट झाला. आन् एका दिशी शिवाजीबापूनं आबाला बोलावून घितला. शिवाजी बापू माथाडी कामगारांचा मुंबईचा पुढारी. सातारा, सांगलीतल्या कामगारांना एकत्र करून त्यांची संघटना चालवणारा. सांगलीतनं निवडून येणारा आमदार बापूचा चांगला दोस्त. दोगांनी हमालीत दिवस काढल्यालं, एका ताटात जेवल्यालं. एकाचं दुकतंय म्हणलं तर दुसराबी दुकतंय म्हणायचा. बापूचा शब्द आबानं कवा खाली पडू दिला

न्हाय. त्यो तडक गाडी घिवून बापूच्या बंगल्याम्होरं उभा राहिला.

"या आबा या, वाट बगीत व्हतो."

"का? काय काढलंसा काम गरिबाकडं?"

"वा! बापूला सांगताय? कोण गरीब, तुमी का मी?"

"झालं. म्हंजी आमुशाच्या घरी पुनव म्हणायचं का तुमास्नी?"

"तसं म्हणा; पण तुमी आला, बरं वाटलं."

"पर बोलावणं का धाडलं म्हणतू म्या?"

"हे बगा, आपल्या मुंबईचा ताप लय वाढलाय. बँक केली आपल्या माणसांची. आता दिवस पालटून गेलं."

"पर तुमच्यामुळंच नव्हं. तुमी आमदार झाला. पतसंस्थेची बँक झाली. सातारा, सांगलीची सारी आपली माणसं तुमामागं हाईत." आबानं बापूला ढिल दिली.

बापू खिडकीतनं लांब समुद्राकडं बगीत म्हणाले, "आबा, ते ठाव हाय आमास्नी, पर तुमच्यासारख्या जिवाला जीव देणाऱ्या गड्यांनी आमाला मोठं केलंया. तुमच्याबिगार झाली असती का बँक? आन् आमी आमदार झालू ते तुमच्यासारख्या दोस्तांच्या पाठबळानं. न्हायतर ह्यो शिवाजी गेला असता की वं पाठणीवर पोत्यांची वजी वाहात त्या बोरीबंदरात. आमी म्हणतो, "आता तुमीच बँक सांबाळली पायजेल."

"म्हंजी?" आबाला धक्काच बसला. "माझ्यासारखा आंगठाछाप माणूस, आन् बँक कशी बगील?" आबा म्हणाला.

बापूनं त्याज्याकडं पाहिलं आन् मिशीला पीळ भरीत म्हणाले, "आबा, तुमी शानपनाचं, लिव्हण्या-वाचण्याचं बोलताय? आवं, त्ये करनारे हजारांनी उभं करतो दारात. तुमावाणी माणसं वाचणारा माणूस कुठनं आणायचा, सांगा? पैका बँकेत जमा करायचा आन् माणसांची बँक करायची, दोन कामं हायेत. थोरलं सायेब म्हणत्यात बेरजेचं राजकारणं करायचं, वजाबाकीचं न्हाई. खरं का खोटं, सांगा?"

आबा आता चितागती झाला. च्यामायला, बँकेची ही बलामत म्हंजी आगीचा खेळ. सोपं हाय का? आपल्याला न्हाय होणार - शाप सांगावं, म्हणून त्यो बापूला म्हणाला,

''बापूसाहेब, तुमी दुसरा माणूस बगा. म्या तुमचं धाकल्या भावावाणी जोडं सांबाळतू. सावलीसारखा मागं राहतू. पर माझ्या गळ्यात नका घालू हे बँकेचं. आवं, म्या गडी उभा-आडवा आडदांड, टकुरं फिरलं की फिरलं! हातं माणूस कसा लोण्याच्या गोळ्यावाणी पायजेल, मऊशार. लसायचा न्हाय, लुसायचा न्हाय. टोचायचा न्हाय. कसं?''

''आबा, हे सारं तुमच्यात हाय म्हणून तर आम्ही निर्णय केलाय. साऱ्या कामगारांनी तुमची निवड केलिया. रातीच बैठक झाली साऱ्या बोर्डाची. साऱ्यांनी ठरवलंया. तुमीच चेअरमन व्हायाचं.''

आता आबाला पर्याय उरला न्हाय. त्याने होकार दिला आन् बापूची कळी खुलली.

''आबा, तुमी बगाल. आहो, हा शिवाजी तुमाला मुंबईचा मेयर केल्याबिगर ऱ्हाणार न्हाय. तुमी बँक संभाळा. आम्ही सारी बगून घेतो.''

दोगांनी आनंदानं धोतराच्या सोग्यानं डोळं पुसलं आन् हासत हासत आबा गाडीत जाऊन बसला.

आबा पाटलाचा आता सहकारी बँकेचा चेअरमन झाला. कोट्यवधी रुपयांची बँक. आपून आडाणी, लिव्हायला येत नाही. साळंत जायाच्या वक्ताला आपून उसाच्या, केळीच्या बागंत लपून बसत व्हतो. लय मैंदाळी चूक केली. साळंत गेलू असतू तर आसं इंगळ्या डसल्या नसत्या. शिवाजी आपल्या बरोबरीचा; पण मॅट्रिक. त्यानं नशीब काढलं. आमदार झाला,आता मंत्री व्हईल. आपून तर खानदानी पाटील. आपल्याला तर मंत्री सहजच व्होता येईल. थोरल्या सायबाचं लय ध्यान आसतंया आपल्यावं; पर तेजी मायला ही आंगठा द्याची पाळी आलीया. ही गोष्ट काय खरी न्हाय. आपून लिव्हायला-वाचायला शिकायचं. काय व्हईल ते व्हईल. रातच्याला शिकवणी लावायची. पर शिकायचं. आता, आबानं निर्धार केला. बँकेचा चेअरमन असा आंगठाछाप, बरूबर न्हाय. झालं, आबाचा पोरगा साळंत जातच व्हता. त्याजी पाटी-पेन्सिल हातात घिऊन आबा 'ग म भ न' शिकायला लागला. शिकवणीला मास्तर नेमला. धंदा, उद्योग, राजकारण, समाजकारण करीत करीत आबानं शाळा सुरू केली. लोक आबाला अंगठाछाप समजत व्हते; पण आबा मोठा जिद्दीचा माणूस. त्याजं लिव्हनं, वाचनं, बोलणं सारं सुधारत गेलं. आबा शिकत गेला, पुस्तकं वाचू लागला.

बँकेच्या मीटिंगची प्रोसिडिंग वाचून मॅनेजरला सूचना देवू लागला. सारी बँक अवाक् झाली. लेका, आबास्नी लिव्हायला-वाचायला येतं की, ताळेबंद कळतुया! प्रत्येकाच्या डोळ्यांत कौतुक. आबा आता मोठमोठाली पुस्तकं वाचायला लागला. मराठीतनं फर्ड्या वक्त्यांसारखी भाषणं करू लागला. शिवाजी बापूंना समजलं. त्यांनीही आबाचं कौतुक केलं.

आबा मोठा संघटक. कैक वर्षं बँकेचा चेअरमन राहिला. मुन्सिपालटीच्या राजकारणात उतरला. बापूचा उजवा हात. बापूचं सारं राजकारण आबा पाहू लागला. बापू-आबा जोडगोळी मुंबईतल्या कष्टकऱ्यांसाठी, कामगारांसाठी, हमालांसाठी, तोलाईदारांसाठी, फुटपाथवरल्या पथारीवाल्यांसाठी देववाणी. जो जो संकटात आसंल त्याला त्याला आबानं पोटाशी धरावं, बापूनं पांघरून घालावं, आन् रडत गेलेलं माणूस हासत, डोळं पुसत मागारी जावं. कुणाच्या पोरीचं लगीन आडलंय, आबा उभा. कुणाच्या पोराचं शिक्षाण रुकलया, आबा म्होरं. कुणाची मयत झालीया, आबा तयार, सारं शिकाळीपास्नं सावडायला जाताना आबा हायेच. गरीब असो, श्रीमंत असो, कामगार असो; आबा प्रत्येकाला आपल्या घरातला वाटत व्हता.

आबा न्हाई आसा मुंबईतला मराठी समाजच न्हाय. कुणाचं पोरगं पैलं आलंया, आबाला समजायचा आवकाश की आबा दारात पेडं घिवून उभा. एवढा मोठा चेअरमन, पर अभिमान न्हाई. अहंकार न्हाई. आपल्या मोठेपणाची मिजास न्हाई की मोठेपणाचा बडेजाव न्हाई. पांढऱ्या धुवाट कपड्यांतला आबा आता बोलताचालता माणसांचा खजिना झाला होता. नावनिशीवार सारं माहीत. समोर उभ्या राहिलेल्या माणसाला आबा नावानं बोलावणार. त्याजं गाव, त्याची पोरंबाळं, त्याजी गावाकडली म्हातारी माणसं आन् गणगोत, सोयरेधायरे - सारे आबाला पाट. कोणत्या गावची माणसं मुंबईत कोणत्या गल्लीत राहत्यात, त्यांच्या अडचणी काय आहेत, सोडवायला काय करावं, सारं आबाच्या डायरीत लिव्हल्यालं.

बगता बगता आबाचा लौकिक मुंबईभर झाला. मुंबईतला माथाडी कामगार, मिल कामगार आबाला आपला नेता मानू लागला. शिवाजीनंबी नावं केलं, तेबी मंत्री झाले; पण आबावरला त्यांचा जीव तसाच राहिला. दोगांनी मुंबईतल्या मराठी माणसांची संघटना एकजीव करून बांधली. गोरगरिबांच्या चुली पेटवल्या,

पोरं शिकवली. लांब पोटासाठी घाटास्नं आलेली ही मराठमोळी माणसं. काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आली. काँग्रेसचं राज्य गल्लीपास्नं दिल्लीपर्यंत व्होतं. एकजिनशी नेतृत्व होतं.

थोरले साहेब म्हणजे महाराष्ट्राचं मोठं वैभव, त्यांच्या शब्दाला मोठा मान. ते ठरवतील ते धोरण आन् ते बांधतील ते तोरण. आबा थोरामोठ्यांच्यात उठूबसू लागला आन् पोरांनी आपट्या खायला सुरुवात केली. थोरला शाळंत डोकं चालत न्हाय म्हणून सिनेमाच्या टाक्या हुडकीत खांद्यावर रुमाल टाकून हिंडायला लागला. पोरगं शाळेच्या नावानं चौपाटीवरील भेळ खायला जाया लागलं. शाळेत दांड्या मारून सोबत्यांसंगं सैराटपणा करत मुंबईत हिंडत व्होतं, हे आबाला समजलंच न्हाय.

बायको पोरांना सांबाळीत व्हती. पैका घरात आला व्होता. पर पैक्यानं बायकुचं टकुरंबी फिरलंतं. तिला आता डागडागिनं आन् कापडाचोपडाचं याड लागलंतं. आबा सकाळपास्नं धंदा आन् राजकारण, गोरगरीब रयत - त्यांची सुख-दु:खं यांत दंग असायचा. कुणीतरी त्याला पोरांची हकिकत सांगायचा. त्याला आबाचं उत्तर एकच, 'म्या हमाल व्हतो. पाठ इकून हिथवर आलो. रांडच्यास्नी सारी सुखं हाईत. सुखं गांडीला टोचत्यात. शिकलं तर त्यांचं नशीब उगडंल, न्हाई शिकली तर हमाली करत्याल. ज्याचं त्याचं नशीब. आपून काय करणार? जलम दिलाय, कर्म कसं देणार? लाखो माणसं गरीब हाईत. माझी पोरं खावून-पिवून सुखी हाईत. मुंबईच्या धारावीतनं आता ती कोळीवाड्यात फलाटात राहत्यात. गांडीखाली गाड्या हाईत्या. त्यास्नी साळंत घातलंया आणि काय करावं?'

आबाम्होरं मंग कुणी कायीबी बोलत नव्हतं; पण आबाला मनाला किती यातना व्होतात ते समद्यास्नी दिसायचं. दिव्याखाली अंधार. साऱ्या जगानं शिकावं म्हणून आबा तळमळायचा. कुणाचीबी पोरं नाव काढत्यात म्हणलं की आबा पळत मदतीला जायाचा; पर नशिबानं त्याज्या पदरात मात्र हे फासे उलटे टाकले होते. तिन्ही पोरांना संगतीनं, पैक्यानं पार बिगडवून टाकलं. पोरं धंदा तरी सांभाळत्याल का न्हाय ह्याजा घोर आबाला सारखा छळत व्होता. आबानं सारी मुंबई आपली केलीती. समाजसेवा म्हणजे आबा. सकाळपास्नं झोपस्तोवर माणसांचा कायम गराडा. ह्यातच बायकूसंगं बोलायचं. खासगी काय ऱ्हायलंच

न्हाई. बायकू अडाणी.

सारा धंद्यातला पैका पोरं उडवीत व्होती. आन् आबा आता नको तेवढ्या राजकारणात गुतला व्होता. डोळ्यांनी दिसत व्होतं. त्यातच पोरींची लग्नं उराकली. थोरलीला जागा चांगली मिळाली. पोरगा इंजिनिअर व्होता. चांगली नोकरी व्होती. पोरगी सुखात पडली. चांगल्या घरी दिली. एका जबाबदारीतनं आबा मोकळा झाला. लग्नाला मोठमोठाली माणसं आलीती. थोरलं सायेब स्वत: होते. शिवाजी बापू तर वरबापच व्होता. त्यानं सारं केलं. सारी माणसं राबराब राबली. आबाच्या पोरीचं लग्न म्हणजे आपल्याच पोरीचं लग्न आसं साऱ्या कामगारांना वाटलं व्होतं. लग्न झोकात झालं. बऱ्यापैकी पैका गेला.

आबा राजकारणात व्होता. त्यानं अनेक लोकांना अन्नाला लावलं. बदल्या केल्या. तिकिटं वाटली. अनेकजण निवडून आले; पण आबानं कुणाचं पाच पैसं घेतलं नाहीत. ही स्वातंत्र्यानंतरची पहिली पिढी होती. ती राजकारणात नीतीला फार किंमत देत व्होती. पैका मिळवायचा तो व्यवसाय करून. आबानं पैका मिळवला तो मोटारधंद्यात; पण घरात पैका व्होता, तो या अडाण्यास्नी चढला. तो काय केल्या उतरंना. सत्ता आबाच्या हातात व्हती, पर ती चढली व्हती बायकू, भाव, पोरास्नी, सग्यासोयऱ्यांस्नी, पैपावण्यांस्नी. ती काय उतरत नव्हती. आबाच्या घरातली माणसं स्वतःला आबा समजून जगायला लागली. आबा देवमाणूस, तर हे सैतान झाले. बगता बगता आबाची पोरं वयात आली. शिक्षणाच्या नावानं शिमगा. नुसती वागण्या-बोलण्यात गुर्मी. राजकारण म्हणजे आळवावरचं पाणी. ते उडत निघालं. आबाची पुण्याई व्होती; पण आता दिस बदलू लागलं.

◆



# पुस्तकाच्या पानांतून




## ब्लॉटिंग पेपर

**स्वाती चांदोरकर**

*चिंतन आणि भावनांची साधलीय छानशी लय...*
*जीवनाचे विविध रंग शोषते 'ब्लॉटिंग पेपर'*

**प्रिय राजन,**

**रा**जन हे नावच असं आहे. ते आधिपत्य गाजवतं. पूर्वीचे राजे ज्यांना इतरजण 'हे राजन' असं संबोधत; पण ती राज्यं गेली, राजा गेला आणि संबोधणारेसुद्धा गेले; पण ते संबोधन एक नाव म्हणून आजही आहे. वाटतं की आपला मुलगा राजासारखा असावा. म्हणूनच कदाचित राजबिंडा असा शब्द तयार झाला. राजा कसा असावा?

आदर्श!

कर्तबगार!

देखणा!

अशी इच्छा असावी हे मान्य; पण प्रत्येक मूल प्रत्यक्षात तसं निपजणं हे मात्र कठीण. मग ते नाम नाव म्हणून राहतं. पूर्वी राजन असं वाचलं, की त्या नावाचं नातं फक्त अंडरवर्ल्डशी आहे असं वाटायचं. तसं ते होतंसुद्धा.

पण, अपवाद असतात.

राजन, तुम्ही नावाप्रमाणे आदर्श, देखणे आणि आधिपत्य गाजवणारे आहात. देखणेपण तुम्हाला तुमच्या आईकडून मिळालं. आधिपत्य तुम्ही तुमच्या वडिलांकडून घेतलं. आदर्श तुम्ही तुमचा निर्माण केलात.

राजा म्हणजे सर्वगुणसंपन्न! त्याने प्रत्येक कलेत पारंगत असायलाच हवं अशी धारणा. आपल्या जोडीदाराबद्दल काही सांगा, असं विचारलं गेलं मला आणि मी त्या दृष्टिकोनातून तुमचा विचार करू लागले. आणि सुरुवातच मुळी तुमच्या नावाने झाली. राजन हे नाव धारण करणारा हा जोडीदार खरंच आहे तरी कसा?

आपल्या इतक्या जवळच्या व्यक्तीबद्दल कधी खोलवर विचार केला जात नाही; कारण आपण त्या व्यक्तीला गृहीत धरलेलं असतं. अथवा वेगळा विचार करावा, अशी आवश्यकता वाटत नाही.

माणसाचा स्वभाव असा आहे, की त्याला आधी दुसऱ्यातलं न्यूनत्व दिसतं. आणि त्यात जर तो जोडीदार असेल, तर मग तेच आधी दिसतं. म्हणजे निवड करताना सर्व चांगलं दिसतं; पण एकत्र राहायला लागल्यावर मात्र जसजशी वर्षं सरत जातात, ते गुण अवगुण ठरू लागतात. ज्या गुणांवर भाळून लग्नाला होकार दिलेला असतो आणि जरी गुण दिसत असले, तरी त्याची वाच्यता करता येत नाही.

आज मी काही लिहिणार आहे तुमच्याबद्दल, ते या दोन्ही गोष्टी वगळून लिहिणार आहे.

राजन विनायक चांदोरकर. गाव पाली. अष्टविनायक असलेलं पाली. राजन, मी जेव्हा प्रथम शरदबरोबर पालीला आले होते, तोपर्यंत मला अष्टविनायक अशी गणपतीची देवस्थानं आहेत, हे माहीतही नव्हतं. मला पालीचं घर खूप

आवडलं. पडघवलीमध्ये वर्णन आहे ना तसं ते घर. अंगण, ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर आणि मग मागचं अंगण. पुढे हेच घर माझं सासर होणार आहे, याची मला सुतराम कल्पना नव्हती.

सर्वांना वाटायचं की माझा प्रेमविवाह आहे; पण आपलं लग्न तर अगदी ठरवून झालेलं.

लग्नानंतर माझ्यासमोर एकच मोठा प्रश्न होता, तो म्हणजे नोकरी. मला नोकरी करणं भाग होतं. नोकरी करणं हा काही माझा पिंड नाही; पण ती संसाराची गरज होती आणि मला विनासायास नोकरी मिळालीसुद्धा. तुमची चिंता दूर झाली. अंधेरीला आपलं हक्काचं घर बांधलं जात होतं. कर्ज होतं डोक्यावर. ते फेडून संसार चालवायचा होता. दोघांच्याही मदतीने.

तुम्ही धडाडीचे. बँकेत नोकरी आणि त्याचबरोबरीने राजकारणात सक्रिय, युनियन लीडर! ते राजकारण मला आजतागायत समजलं नाही. राजकारण हाही माझा पिंड नाही. म्हणजे लग्नाची, संसाराची सुरुवात माझ्या दोन नावडत्या गोष्टींनी झाली.

मला राजकारण कधी समजलं नाही. समजून घ्यावं असं कधीही वाटलं नाही. साहित्य, संगीत, काव्य अशा वातावरणात वाढलेली मी. तिथे तरी राजकारण नव्हतं.

भिन्न वृत्ती आपल्या. त्याचा त्रास दोघांनाही झाला. तुमचं तुमच्या राजकारणातलं स्थान, त्याचं महत्त्व मला समजलं नाही असं नाही; पण त्यात मला रस नव्हता. मला कला अवगत होत्या; पण नोकरी ही पण एक कला आहे, हे अवगत नव्हतं. अनेक नोकऱ्या बदलल्या. मला मिळतही गेल्या; पण शेवटी नोकरी सोडून दिली. मनाविरुद्ध होणारी माझी मानसिक रस्सीखेच मी संपवून टाकली. आणि तुमच्या सर्व आकांक्षांवर पाणी पडलं. अक्षरश: रडलात तुम्ही! आणि मी शांत होते. मनाची कुतरओढ थांबली होती. कर्ज कसं फिटणार, हा तुम्हाला लागलेला घोर. तो मलाही होता; पण मला वेगळं काही करायचं होतं. माझं, स्वत:चं. तुम्ही एककल्ली, एकव्यासंगी आणि मी बहुव्यासंगी. इतक्या भिन्न वृत्तींच्या व्यक्तींना तो किमयागार एकत्र का आणतो, हा प्रश्न आहे. असा प्रश्न कदाचित प्रत्येक जोडप्याला असेल. युगानुयुगे हा प्रश्न चालत आलेला आहे. उत्तर मात्र नाही कुणाकडे. यालाच समतोल साधणे

म्हणत असतील का?

'शून्यातून साकारलं आहे' म्हणजे काय? याचं उत्तर आज आपण दोघंही ठामपणे देऊ शकतो. मी चंचल आणि तुम्ही स्थिर, ठाम. माझ्यासारखीला असाच जोडीदार हवा. जो व्यवसाय मी घरात बसून सुरू केला, त्या व्यवसायाने घरपण दिलं नाही. जोडीदारमधला जोडी हा शब्द मागे पडला, दार कायम एकासाठी उघडं आणि एकासाठी बंद राहिलं.

म्हणून मधल्या काळात एकटेपणाची माझी भावना पार पराकोटीला गेली. राजकारणात इतकं मग्न असलेलं तुमचं मन संसारात कधी गुंतलं नाही. संसार म्हणजे केवळ कर्तव्य. घर एकाकी होत चाललं आहे हे तुमच्या खिजगणतीत नव्हतं. हा गुण की दोष?

मृण्मयीचा जन्म माझ्या एकटेपणावर मात करणारा ठरला. तिने घर भरून आणि भारून टाकलं. तिच्या जन्मानंतर आपल्या नशिबाचे फेरे बदलले. तिने सिनेमात केलेलं काम, तिला सर्वश्रेष्ठ बालकलाकार म्हणून मिळालेलं पारितोषिक, कलेचा वारसा पुढल्या पिढीत उतरला. हा मात्र मैत्रेयचा पायगुण. त्याच्या जन्मानंतरच हे सर्व झालं. आपली दोन्ही मुलं आपल्यासाठी भरभराट घेऊन आली.

टुरिस्ट टॅक्सीचा व्यवसाय सुरू केला. राजन, मला कधीही वाटलं नव्हतं, की व्यवसाय करण्याची पात्रता माझ्यात आहे. तुमची मदत होतीच. त्याशिवाय शक्य पण नव्हतं. घराला आता व्यवसायाचं रूप आलं. सतत येणारे ड्रायव्हर्स, फोन्स, बिलं करणं, कंपन्यांमध्ये जाणं, एक ना दोन; पण जमलं सर्वकाही. या व्यवसायापायी खूप भांडणं, खूप चिडचिड. सकाळ-रात्र एकच. ड्रायव्हर्स, बुकिंग, अपघात, पगार, गाडीची कव्हर्स धुणं... आणि अव्याहत वाजणारे फोन्स. कैकदा वाटलं, बस झाला बिझनेस. नको. कर्ज फिटलं की थांबावं; पण एकदा का सुरुवात झाली, की थांबता येणं कठीण असतं. कामं झाली तर त्यात काय मोठं? नाही झाली तर शिमगा. वेळप्रसंगी तू ड्रायव्हर म्हणून जाणं, दिवसा ऑफिस, राजकारण बघणं... नाही कधी चौघं कुठे बाहेर गेलो, नाही कधी हॉटेलात गेलो. मग बाहेरगावी जाणं तर दूरच. रिलॅक्स म्हणजे काय? हे कसलं आयुष्य जगत होतो आपण? की फक्त मी? कुठे गेल्या त्या मैफिली? ती गाणी? एक गाणं ऐकता यायचं नाही. फोन

वाजला की आधी गाणं बंद; कारण हे इतरांसाठी ऑफिस होतं.

तुम्ही केलेल्या कष्टांना सुमार नाही; पण त्यात उमेदीचे, बहराचे दिवस पार करपून गेले.

मला माहीत आहे तुमचं बालपण. ऐकलं आहे अनेकदा. अकरावीपर्यंत तुमच्या पायात चपलासुद्धा नव्हत्या. तुम्ही सगळीच भावंडं अशी वाढलात. खूप गरिबी होती असंही नाही. खाऊनपिऊन सुखी; पण त्यावेळची रीत तशी होती, मुलांचे लाड करायचे नसतात, अथवा लाड हा प्रकारच अस्तित्वात नव्हता; पण माझं तसं नव्हतं ना. लाड होते, प्रेम व्यक्त केलं जायचं, चांगलं काही केलं तर कौतुक व्हायचं.

तुमचे वडील बापू, आजही भास होतो त्यांचा. ते पडवीत बसलेले आहेत. त्यांनी मारलेली हाक अगदी खाली बोळाच्या टोकापर्यंत पोहोचायची असा त्यांचा आवाज. हळू बोलणं हे माहीतच नाही. आवाजात जरब. मुलं ऐकणार नाहीत हे शक्यच नाही. संवाद नाही, तिथे तर फक्त सक्ती. सक्ती हा शब्द कदाचित तुम्हाला रुचणार नाही; पण ते म्हणतील तेच, हा त्यांचा अट्टहास.

आणि माझे बापू अगदी त्यांच्या उलट. हळुवार बोलणं, चर्चा करणं, मत विचारणं. हुकूमशाही नव्हते ते. आता वाटतं की त्यांनी थोडीतरी हुकूमशाही करायला हवी होती, म्हणजे मी जरा वेगळी झाले असते. बापू म्हणायचे की ते पल्सवर जगणारे नाहीत तर इम्पल्सवर जगणारे आहेत.

व्यवहारात असं राहून चालत नाही हे मी तुमच्याकडून शिकले. किती शिकले माहीत नाही. आजही तुम्ही मला अगदी सहज म्हणून जाता, तुला यातलं काही कळत नाही.

तुम्ही म्हणूनच मुलांचे लाड करू शकला नाहीत आणि मी लाड केलेलं तुम्हाला कधी आवडलं नाही. मुलं वाया गेली तर तू कारणीभूत असशील, असं तुम्ही मला अनेकदा म्हणत आलात; पण मुलं नाही गेली वाया. त्यांनी कधी मान खाली घालायला लावली नाही. तुमची आधीच ताठ असलेली मान ताठच राहिली.

तुमचं व्यक्तिमत्त्व एकदम भारदस्त. सहा फूट उंची, रुंद खांदे, रुबाबदार, गोरा रंग. तुमचं कौतुक आक्काला असणं अगदी स्वाभाविक. त्यात तुम्ही

शेंडेफळ. शिवाय हुशार! आजही चांदोरकर खानदानात काही समस्या निर्माण झाल्या तर सल्ला तुमचाच घेतला जातो; कारण एकच. तुम्ही भावनेच्या भरात सल्ला देत नाही. तारतम्य सांभाळून दिलेला सल्ला मानला जातोच.

मला नाही जमलं. मी कायम वाहून जाणारी. काळे घराण्याची ही परंपरा आहे. जे काही मनाला भिडेल तिथे स्वाती गेलीच वाहून.

या दोन्ही गोष्टी चांगल्या की वाईट? माहीत नाही. खरं तर वाईटच; कारण दोन्ही टोकाच्या वृत्ती. मध्य ना तुम्हाला साधता आला, ना मला.

मुलांना वळण लावायचं हा उद्देश; पण ते कसं लावायचं, हे कसब मुळातून वृत्तीत असावं लागतं. मला नमस्कार कर म्हणून केलेला नमस्कार, याला वळण म्हणत नाहीत. न सांगता जो नमस्कार केला जातो तो खरा नमस्कार. हे खरं वाकणं. नमस्कारासाठी वाकणं यात आनंद असायला हवा; पण वाकणाऱ्याला जर आनंद नसेल; पण वाकायला लावलं यात जर समाधान असेल, तर मात्र चूक होते. ते खोटं समाधान आहे. शरीर वाकलं फक्त, मन ताठच राहिलं.

एक समाधान तुम्ही बापूंना दिलंत.

बापूंना कधी कायदा समजलाच नाही. त्यांना कुणी नोटीस पाठवली. कोर्टाचा कागद आला आहे म्हटल्यावर त्यांनी तुम्हाला बोलावून घेतलं. त्या नोटीसला काही अर्थ नाही; उत्तर पण द्यायची आवश्यकता नाही. तुम्ही असं म्हणालात आणि त्यांना हायसं वाटलं.

इंग्रजी भाषेवर असलेलं तुमचं प्रभुत्व खरोखर वाखाणण्याजोगं. तुमची अनेक पत्रं मी वाचली आहेत, जी तुमच्या राजकारणासंबंधी आहेत आणि म्हणूनच मला नेहमी खेद वाटत राहिला की तुमची ही हुशारी, हे ज्ञान मुलांच्या प्रगतीसाठी उपयोगी पडलं नाही. वेळच नव्हता तुमच्याकडे. ती आपली आपण शिकली, मोठी झाली. तुमच्या या हुशारीचा फायदा बँकेतल्या लोकांना झाला. तुम्ही त्यांची वकिली केलीत आणि जे निर्दोष होते त्यांना न्याय मिळवून दिलात. बँकेत होणारे घोटाळे सर्वश्रुत आहेत. त्यातले काही जण निर्दोष असतात; पण दोषी ठरवले जातात. तुम्ही त्यांना वाचवलं आहे. आजही ते तुमचा मान राखतात आणि मला त्याचा अभिमान आहे.

एक अगदी मनापासून सांगते राजन, मला माझ्यातली कमतरता पूर्णपणे

माहीत आहे. जाणीव आहे. मी नाही हुशार तुमच्यासारखी. कधी रमलेच नाही शालेय शिक्षणात. वेळ गेली आहे निघून कधीचीच. आता अभ्यास करायचा म्हटलं तर घाम फुटेल मला.

हे सर्व असं आहे. आणि तरीही आपण आहोत, एकत्र आहोत. मी अशी दोन-तीन पुस्तकं वाचली आहेत जी ख्यातनाम व्यक्तींवर आधारित आहेत. म्हणजे त्यांच्या बायकांनी त्यांच्या नवऱ्यावर लिहिलेलं त्यांचं मनोगत. वाचताना कधी हसू आलं, कधी राग आला, कधी वैषम्य वाटलं. खरंच, मी तरी का लिहीत आहे? वाचकाला यातून मी काय देणार आहे?

नाही, कुणाला काही देण्यासाठी, सांगण्यासाठी हे लिखाण नाहीये. हे फक्त दुरून बघणं आहे तुमच्याकडे आणि माझ्याकडे. प्रत्येक चूल सारखीच असते का? असेल; पण त्यात जो अग्नी असतो, त्या ज्वाळा भडकवायच्या की मंद ठेवायच्या हे जिच्या-तिच्या हातात.


राजन, तुम्ही कर्तृत्ववान आहात, हे वादातीत आहे. 'विद्या विनयेन शोभते' असं शाळेत लावलेल्या एका पाटीवर वाचल्याचं आठवतं. विद्या, हुशारी याला विनयाची किनार हवी. सगुणसंपन्न कुणीच नसतो. तुम्हीच ठरवा तुम्ही विनयी आहात का? राजा विनयशील असतो? कुणी समोरची व्यक्ती वाद घालता घालता एका क्षणी गप्प होते तर याचा अर्थ असा नाही की वाद घालणारा जिंकला. क्वचित तुम्ही गप्प होत असाल कधी. माहीत नाही. शेवटी हे तुमचं मन सांगेल की केव्हा तुम्ही जिंकता आणि केव्हा हरता. इतरांसमोर मान्य करण्याची आवश्यकता नाही; पण स्वत:शी मान्य करण्यास काय हरकत आहे? तुम्ही शांत व्हाल. सततची तगमग शांत होईल.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

# ईडन

**देवदत्त पट्टनायक**




देवदत्त पट्टनायक यांच्या प्रदीर्घ अभ्यास आणि आकलनातून साकारलेलं धर्मविषयक चिंतन...


**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# माझदाचे जादूगार

**अश्विन सांघी**

अनुवाद

**मुग्धा गोखले**




विश्वभ्रमंती घडवत आत्मपरीक्षणाचा साक्षात्कार घडविणारं अनोखं कथानक असलेली अश्विन सांघी यांच्या 'भारत' मालिकेतील रंगतदार कादंबरी...

**किंमत : ५९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# रूम नंबर ३१२ आणि इतर कथा





अनुवाद
**सुनंदा अमरापूरकर**

चटकदार कथानकात गुंतवून ठेवणारं पिटुकलं रहस्य असणाऱ्या बहारदार कथा...

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# दि प्रिन्सेस




**मनोहर माळगांवकर**
अनुवाद
**भा. द. खेर**


स्वातंत्र्याची पहाट उगवत असताना ढासळत गेलेला संस्थानिकांचा वर्षानुवर्षांचा रुबाब आणि नव्या जडणघडणीची अनोखी कहाणी

**किंमत : ४९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# धत्राशी

**महादेव मोरे**





कुठे संशयपिशाच... तर कुठे तारुण्याचा बाजार... कुठे एकटेपण... तर कुठे हलक्या कानाचा विकार... विकारवश जगाचं व्यामिश्र चित्रण

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# म्हाई

**महादेव मोरे**




कधी प्रेमी जीवांची उलघाल... तर कधी नरबळीचा थरार... कधी म्हाईची धमाल... तर कधी वासनेचा विखार... ग्रामीण बाजाच्या बहुढंगी कथा

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२४ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

'बेधुंद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - सदानंद कदम यांचा जन्मदिन**

'सांगाती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१८ फेब्रुवारी -लिसा सी यांचा जन्मदिन**

'शांघायच्या मुली', 'ड्रीम्स ऑफ जॉय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११२५/- । सवलत किंमत ८४५/-**

---

**१९ फेब्रुवारी - छ. शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा श्री शिवछत्रपती', 'श्रीमान योगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'शिवछत्रपती : एक मागोवा', 'महासम्राट-झंझावात', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३७४/- । सवलत किंमत १६६२/-**

---

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल'(मराठी) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**

**२० फेब्रुवारी - पीअर बाऊल यांचा जन्मदिन**

'द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १५४/-**

**२१ फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**

'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**

**२४ फेब्रुवारी - डॉ. सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**

'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

**२४ फेब्रुवारी - छ. राजाराम महाराज जयंती**

'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३८७/-**

**२४ फेब्रुवारी - गिलियन फ्लिन यांचा जन्मदिन**

'गॉन गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५६२/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**

'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०००/- । सवलत किंमत ६००/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**

'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**२७ फेब्रुवारी - मराठी राजभाषा दिन**

रु. ३०००च्या खरेदीवर ४० टक्के सवलत

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**

**संच १**-'A TO Z विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'संकरित', 'डिंभक', 'देव?

छे! परग्रहावरील अंतराळवीर', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४५५/- । सवलत किंमत १५९६/-**

**संच २**-'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२', 'असे घडले सहस्रक', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'अंतरिक्षाचा वेध','विज्ञानातील सरस आणि सुरस', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणीच खेळणी', 'खेळणी विज्ञानाची', 'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती', 'चला, प्रयोग करू या!' (३ पुस्तकांचा सेट), 'इ.स. २५९५' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४९५/- । सवलत किंमत १६२१/-**

**संच ३** - 'गार्डिअन', 'जॉर्ज अ‍ॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'रोबॉट फिक्सिंग', 'स्वप्नचौर्य', 'असे शास्त्रज्ञ, असे संशोधन', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'शास्त्रज्ञांचे जग', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे', 'भिंतींना जिभाही असतात', 'प्लँटोन, 'खुजाबा', 'जॉर्ज अ‍ॅन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज अ‍ॅन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज अ‍ॅन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६४६५/- । सवलत किंमत ४२०२/-**

---

**२८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन**

'क्रिटिकल मास', 'द अ‍ॅटर्नी', 'द सिमीऑन चेंबर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४९/-**

---

## खालील संचांवर १ ते १५ मार्च दरम्यान खास सवलत

**१ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन**

'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९९/-**

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स', 'अँड द माउंटन्स एकोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७५०/-**

**४ मार्च - दिप्ती जोशी यांचा जन्मदिन**

'नि:शब्दाचे मौन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३४९/-**

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

'अराइज, अवेक', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'कनेक्ट द डॉट्स', 'आय हॅव अ ड्रीम', 'शाइन ब्राइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १७३८/-**

**८ मार्च - महिलादिन**

'रुपेरी 'सिंधू', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल : भाग ३', 'नोबेल ललना - भाग १' , 'नोबेल ललना - भाग २', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'अॅज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'अॅज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...', 'अॅज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', `Be The Change... भ्रष्टाचाराशी लढा', 'आय डेअर', 'इट्स ऑलवेज पॉसिबल', 'मजल... दरमजल...', 'व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'जाणती राणी महाराणी ताराबाई', 'कृष्णसखी राजराणी मीराबाई', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'रणरागिणी दुर्गाराणी',

‘सती साध्वी देवी अहिल्या’, ‘बंधमुक्त होताना...’, ‘ब्रह्मकन्या’, ‘माय डॉटर माय मदर’, ‘नेतृत्व निर्मिती’, ‘निर्भय प्रशासन’, ‘करवीर छ. इंदुमती राणीसाहेब’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६८१०/- । सवलत किंमत ४४२७/-**

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

‘वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध’, ‘पहिली फेरी?’, ‘साहेब संध्याकाळी भेटले..’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१४ मार्च - शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

शेवडे गुरुजी लिखित २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५०४/- । सवलत किंमत १७९७/-**

**१४ मार्च - जॉन लेन यांचा जन्मदिन**

‘THE ART OF AGEING’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**


**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा**


**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**

## आवर्जून वाचावे असे काही





































**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/02/2024 Posting Date : 11/02/2024

**गायीच्या आचळांवर येणारे पूमिश्रित फोड (cowpox) ते 'लस मैत्री'**




# भारताच्या लस-निर्मितीतील प्रगतीची गोष्ट

लेखक : **सज्जन सिंग यादव**
अनुवाद : **मंजुषा मुळे**

**आवर्जून वाचावे...**

**मानवी दु:खाचे आणि जीवनाचे विविध पदर वास्तवतेने उलगडणाऱ्या कथांचा संग्रह**




# हेडाम

लेखक : **महादेव मोरे**

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______